हिरा… राजस-

श्रीवरा-

# दैवज्ञवल्लभ

( महाराष्ट्र भाषांतर सहित )

ॐ


भाषांतरकर्ता—

गणेश भट्ट ठाकूर आमोणकर ज्योतिषी

मु. आमोणें पो. डिचोली, प्रां. गोवा.



— मुद्रणस्थल —

" संगमोदय " छापखाना, सांगें, गोवा.

शके १८५१] किंमत १२ आणे [सन १९२९.

☞ Editado por *Vithala V. Gauncar* de Sirodà, apr. 5° a. do Liceu, Tip. " SANGAMODAY " de *N. A. N. Pattancar* de Sanguem.

याचीं
ठिकाणें:—

१ महेश्वर ग. भट्ट ठाकूर मु. आमोणें, पो. डिचोली, गोवा.

२ व्यवस्थापक "संगमोदय" छापखाना, मु. पो. सांगें, गोवा.

३ व्यवस्थापक "हिंदु फॉर्मसी" मु. पो. पणजी, गोवा.

४ गोविंद सदाशिव ठाकूर मु. बोरडें, पो. डिचोली, गोवा.

या पुस्तकासंबंधीं सर्व प्रकारचे हक्क भाषांतरकर्त्यानें स्वाधीन ठेविले आहेत.

॥ श्री ॥

श्रीमन्महाराजविक्रमार्कराजस-
भाभूषण पंडितवर श्रीवरा-
हमिहिराचार्यविरचिता-

# ॥ दैवज्ञवल्लभा ॥



[ महाराष्ट्र भाषांतर सहिता ]

भाषांतरकर्ता—
महेश्वर गणेश भट्ट ठाकूर आमोणकर ज्योतिषी
रहाणार आमोणें, डिचोली-गोवा.

शके १८५१
— किंमत १२ आणे —

मुद्रक

**ज्योतिर्भूषण-नारायण अनंत नाईक पाटणकर ज्योतिषी,**

मालक “ **संगमोदय** ” छापखाना; C/o आर्यविज्ञानकार्यालय

※ सांगें-गोवा. ※

# प्रस्तावना

सूर्य दाखविण्याकरितां दिव्याची जरूरी लागत नाहीं. स्वयप्रकाशित, स्वयंसिद्ध व्यक्तींची ओळख इतर साधनांनीं कशी दाखविणार? आज ज्या ग्रंथाविषयीं व ग्रंथकर्त्याविषयीं सांगावयाचें आहे, त्यांचीही गोष्ट अशीच आहे. ज्यांनीं जगद्वंद्य असा **बृहज्जातक** नांवाचा केलेला ग्रंथ, शेंकडों वर्षांपासून आसेतुहिमाचल सर्व विद्वानांना शिरोधार्य झाला आहे, त्याच विख्यात अशा **श्रीवराहमिहिराचार्यांनीं** प्रश्नशास्त्राला आधार भूत, असा हा **दैवज्ञवल्लभा** नांवांचा ग्रंथ रचिला आहे. वैद्यकांत चरक संहिता कर्त्याची, जशी "**चरकांत** आहे तेंच इतर ग्रंथांत मिळेल, व इतर ग्रंथांत असून **चरकांत** नाहीं, अशी गोष्टच नाहीं" अशी प्रतिज्ञा आहे, तसेंच याही ग्रंथासंबंधीं मानतां येईल. फार कशाला, प्रश्नशास्त्रांत सर्व ज्योतिष्यांस प्रमाणभूत व आधारभूत होऊन राहिला आहे तो **षट्पंचाशिका** ग्रंथ, याच ग्रंथकर्त्याच्या, **श्रीपृथुयशा** नामक पुत्राची कृती आहे. व त्यानें स्वतःच्या कृतींत एकुणएक प्रमाणें, पित्याच्या ग्रंथाधारावरूनच छायारूप घेतलीं आहेत, हें तज्ज्ञांस दोनी ग्रंथ पाहातां समजून येईल. तात्पर्य, अशा सर्वांच्या आधारभूत ग्रंथाविषयीं आणिक विशेष ती ओळख आह्मी काय दाखविणार ? या ग्रंथाचे एकंदर अध्याय १५ असून श्लोकसंख्या जवळजवळ २२५ सवादोनशें आहेत अर्थात् **षट्पंचाशिकेच्या** चौपटीवर, ह्मणजे चौपट माहितीनें भरला आहे. यांत त्या त्या विषयक प्रश्नावर, असे सुलभ, अनुभविक व चमत्कारिक योग सांगीतले आहेत कीं वाचतां वाचतां मन थक्क होऊन जातें. तात्पर्य, अशा अप्रतिम ग्रंथावर संस्कृतटीका उपलब्ध नाहीं हें आश्चर्यच आहे.

ज्या **भट्टोत्पलांनीं** बृहज्जातक, लघुजातक वगैरे **वराहमिहिराचार्यांच्या** ग्रंथांवर व **षट्पंचाशिका** वगैरे इतर ग्रंथांवर टीका केली, त्यांची या ग्रंथांवर टीका नसावी काय ? किंवा अशा जुनाट कितीतरी ग्रंथांवरील टीका, किंवा सहस्त्रावधी कितीतरी जुने ग्रंथ, आमच्या देशावर जे अनेक परचक्रादिक आघात आहेत त्या धुमश्चक्रींत भस्मसात्, नष्टप्राय, किंवा स्थानभ्रष्ट होऊन परकी देशांत गेले आहेत, हें इतिहासज्ञांस माहीत आहेच. तसें कांहीं तरी तूर्त विषयांत झालें असलें पाहिजे. या ग्रंथावर एक हिंदी भाषेंत टीका असून, ती **मुंबईत व्यंकटेश्वर प्रेसांत** छापली आहे. आमच्या संग्रहीं या **दैवज्ञवल्लभा** ग्रंथाची मूळ हस्तलिखित अतीशय जुनी अशी प्रत आढळली व वाचतां वाचतां त्यांतील अनेक योग पाहून फार समाधान झालें. पण,

साधारणतः दुर्बोध अशा संस्कृतांत असलेल्या या ग्रंथरत्नाचा सर्वांस उपयोग व्हावा ह्मणून, त्यावर प्राकृत भाषांतर असावें असें मनांत येऊं लागलें. परंतु एकतर ग्रंथाचें गांभीर्य व दुसरें माझी अल्पमती, तेव्हां हें काम व्हावें कसें असा विचार पडला. परंतु ज्या अर्थी षट्पंचाशिका ग्रंथाचीं दोनचार प्रेसांत निरनिराळीं मराठी भाषांतरें छापलीं असून, या ग्रंथाकडे कोणाचें लक्ष वेधलें नाहीं, तेव्हां होईल तसें भाषांतर करून, जगापुढें ठेवावें व चुकीची क्षमा मागून, सुधारून देण्याविषयीं विनंती करावी असा विचार करून, हें माझ्या अल्पमतीप्रमाणें भाषांतर तडीस नेलें आहे, तें कितपत साधलें आहे हें पाहाण्याचें काम विद्वानांचें आहे. तेव्हां आमची सज्जनांस विनंती आहे कीं, ही माझी बालभावाची प्रथम कृती आहे. ही जरी अयथार्थ असली, तरी कोडकौतुक करून व तिला शिक्षण देऊन नीट करावी व मान्य करून घ्यावी ह्मणजे माझ्या श्रमांचे सार्थक होईल. व मला आणखीही कांहीं विद्वत्सेवा करण्यास हुरूप येईल.जगदीश ही माझी इच्छा पुर्ण करो.

ग्रंथाच्या पारिभाषीक संज्ञा समजण्याकरितां, ग्रहांचीं, राशींचीं,भावांचीं स्वरूपें वगैरे सर्व माहिती परीशिष्टरूपानें देण्याचा विचार होता. पण **निर्णयसागर, रामतत्व प्रकाश** वगैरे प्रेसांत छापलेल्या **षट्पंचाशिका** पुस्तकाच्या शेवटीं तशी सर्व माहिती दिली असल्यानें, तीच याही पुस्तकांत देऊन जागा अडवणें बरें वाटलें नाहीं. वरून जिज्ञासूंनीं ती माहिती तशा बाजूनें करून घ्यावी.आतां ग्रंथकर्त्याच्या कालाविषयीं विशेष कुठें ऊहापोह दिसत नाहीं. पण अमरकोशाच्या प्रस्तावनेंत "**धन्वंतरिः क्षपणकोमरसिंह शंकू वेतालभट्ट घटखर्पर कालिदासाः ॥ ख्यातो वराहमिहिरो नृपतेः सभायां रत्नानि वै वररुचिर्नव विक्रमस्य** ॥१॥ या दिलेल्या प्रमाणावरून, हा **वराहमिहिराचार्य विक्रमादित्याचा** समकालीन, ह्मणजे जवळजवळ दोन हजार वर्षांच्या जवळचा असावा. असो. जे विद्वान आहेत त्यांना "एकदां तरी हें भाषांतर पाहून मला कृतार्थ करावें" अशी सविनय विनंती करून व जे ज्योतिःशास्त्रांत नवीन प्रवेश करणारे आहेत, त्यांना "तुह्मांला या पुस्तकावरून तुमचा मार्ग सुलभ होईल" असा उपदेश करून हा प्रस्तावनेदाखल लांबलेला लेख आटोपतों.

या पुस्तकांत गैरमाहितीनें किंवा नजरचुकीनें कांहीं चुका राहिल्या असतील तर सहृदय व विद्वान वाचकांनीं कृपा करून अगत्य कळवाव्या. त्यांचा साभार स्वीकार करून दुसरी आवृत्ती काढणें होईल तर त्यावेळीं अवश्य सुधारणा करूं.

आमोणें-डिचोली.<br>गोवा.<br>मि. मार्गशीर्ष शु. पौर्णिमा<br>शके १८५१.

भाषांतरकर्ता—

महेश्वर [illegible] ठाकूर

३८४०

दा. क्र. ३८४०.
नोंद नं. ६६२८

॥ श्रीजयति ॥

# दैवज्ञवल्लभा

[ प्राकृत टीकासहिता ]



॥ अथ प्रश्नावताराध्यायः प्रारभ्यते ॥ १ ॥

नत्वोद्गिरंतमनलं भैरवमद्वैतमीश्वरं नृहरिं ।
श्रीपति नैषा क्रियते प्रश्ने दैवज्ञवल्लभारचना ॥ १ ॥

ज्याच्या मुखांतून अग्निज्वाला निघत आहेत, अशा भयंकर, द्वैतरहीत, ईश्वर, नृसिंहाप्रत नमन करून, श्रीपती (वराहमिहिर) संज्ञक आचार्य, दैवज्ञवल्लभा नामक प्रश्नग्रंथाची रचना करिता झाला.

दीप्ताद्यं दशभेदं व्योमचराणांनिरूप्य भावफलं ।
पृष्टो यद्यत्कथयति शुभाशुभं तत्तदन्यथा नोक्तम् ॥२॥

ग्रहांच्या दीप्तादि दहा अवस्थांचा विचार करून, जो ज्योतिषी शुभाशुभ भावफल सांगतो, त्याचें सांगणें खोटें होत नाहीं.

दीप्तो दीनः स्वस्थो मुदितः सुप्तः प्रपीडितो मुषितः ।
परिहीयमानवीर्यः प्रवृद्धवीर्योऽधिवीर्यश्च ॥ ३ ॥

दीप्त, दीन, स्वस्थ, मुदित, सुप्त, प्रपीडित, मुषित, परिहीयमानवीर्य, प्रवृद्धवीर्य, अधिवीर्य, अशा अवस्था १० आहेत.

स्वोच्चे दीप्तो नीचे दीनः स्वगृहे व्यवस्थितः स्वस्थः ।
मुदितो मित्रगृहस्थो रिपुगेहस्थो भवेत्सुप्तः ॥ ४ ॥
अन्यैर्विजितो युद्धे निपीडितोऽस्तंगतो मुषितः । परि-
हीयमानवीर्यो नीचाभिमुखं प्रसर्पंश्च ॥ ५ ॥ गच्छ
न्स्वोच्चाभिमुखं प्रवृद्धवीर्यः समाख्यातः । शुभवर्ग-
स्थः खेटोऽधिकवीर्यो विपुलरश्मिश्च ॥ ६ ॥

ग्रह उच्चराशींत असल्यास दीप्तावस्थ १, नीचराशींत दीन २, स्वगृहांत स्वस्थ ३, मित्रगृहांत मुदित ४, शत्रुगृहांत सुप्त ५, ग्रहयुद्धांत पराजित निपीडित ६, अस्तंगत मुषित ७, नीचराशीकडे जाणारा परिहीयमानवीर्य ८, उच्चराशीकडे जाणारा प्रवृद्धवीर्य ९, उदीत व शुभषड्वर्गांतील ग्रह अधिकवीर्य १० होय.

दीप्ते सिद्धिरनुत्तमा नरपतेर्दीने च दैन्यागमः,
स्वस्थे स्वे मनसि स्थितं च भवति श्रीकीर्तिसौख्यादिकं ॥
आमोदो मुदिते यथेप्सितफलप्राप्तिः, प्रसुप्तेविपत्,
पीडा शत्रुकृता प्रपीडिततनौ, मोषंगतेर्थ क्षयः ॥७॥
भवति प्रवृद्धवीर्ये गज तुरग सुवर्ण भू लाभः ॥ तद्व-
दधिवीर्ययुक्ते शक्तित्रयसंपदादि बाहुल्यम् ॥ ८ ॥

अर्थ उघड आहे. यांत परिहीयमानवीर्य ग्रहाचें फल आलें नाहीं. परंतु त्याच्या परिस्थितीवरून, द्रव्यनाश वगैरे अशुभच असणार.

पुष्पैः फलैः कनकरत्नयुतैः स्वभूमौ नक्षत्रजाति स-
हितं ग्रहराशिचक्रं । अभ्यर्च्य भक्तिभरबंधुरकंधरा
ग्रः श्रद्धां विधाय निजचेतसि निर्विकल्पे ॥९॥ प्रातः
पुमान्विहितदेवगुरुप्रणामः पाणौ वहन्कुसुमरत्न
फलाक्षतांश्च । सत्कृत्यदैवविदमादरमादधानः पृच्छे
त्सकृच्छुभमनाःशुभादिङ्मुखस्थः ॥ १० ॥

आपल्या घरांत नक्षत्रसहित ग्रहचक्राची पूजा, भक्तियुक्त निर्विकल्प श्रद्धायुक्त मनानें, पुष्पादिकांनीं करून, प्रातःकाळीं देवगुरु वंदन करून, रत्नें, फलें, पुष्पें अक्षता हातांत घेऊन, आदरपूर्वक ज्योतिष्याचा

सत्कार करून, प्रसन्नांतःकरणानें शुभदिशेकडे मुख करून, एकवेळीं एकवार प्रश्न करावा.

प्रश्नाक्षरैरुदयहेतुभिरुल्लसद्भिर्बाह्यस्थितैश्च शकुनै-रधिगम्य सम्यक् । प्रष्टुः शुभं च यदि वाप्यशुभं प्रयत्नात्तत्कालजं तदिह दैवविदाभिधेयम् ॥ ११ ॥

प्रश्नाक्षरांवरून व बाह्य शकुनांवरून पृच्छकाच्या प्रश्नाचें शुभाशुभफल ज्योतिष्यानें प्रयत्नानें जाणून कथन करावें.

फलभरकुसुमाभिरामभूमीरुहभुवि गोमयपुष्पतो-यवत्यां । चरणसुखकृतिप्रपृच्छतां स्यादभिमतसिद्धिरसंशयेन पुंसाम् ॥ १२ ॥ दृक्चेतसोः सुखकरी यदि भूमिरस्ति मांगल्यवस्तुविषये शुभदर्शने चेत् । पृच्छाविधौ शुभमुपस्थितमादरेण तत्रापि वाच्यमिति वक्ति मयो मणित्थः ॥ १३ ॥

ज्या भूमीवर पुष्पफलशोभित वृक्ष आहेत, व फुलें, शेण, पाणी असून पायांना सुखकर आहे, तिथें निःसंदेह कार्यसिद्धि सांगावी. दृष्टि व चित्त यांस सुखकारक अशी प्रश्नभूमि असून, त्यावेळीं मंगल वस्तु दिसेल, किंवा ऐकण्यांत येईल, तर प्रश्नाचें शुभफल प्राप्त होईल, असें मय, मणित्थ वगैरे आचार्य सांगतात.

॥ इति प्रश्नावतारोनाम प्रथमोऽध्यायः ॥ १ ॥

---

## ॥ अथ शुभाशुभाध्यायः प्रारभ्यते ॥ २ ॥

---

प्रष्टुः शुभैः पंचभिरिष्टलाभोनिष्टप्रदैः पंचभिरप्यनिष्टं । तुल्यैर्बलाबलवशात्फलमूहनीयं ज्ञेयं चतुर्भिरथवापि फलं बलाच्च ॥ १ ॥

वर सांगितलेले पांच प्रकारचे शुभशकुन व यांच्या उलट अशुभ शकुन यांवरून शुभाशुभ फल बलाबल व आधिक्य स्वबुद्धीनें जाणून त्याप्रमाणें सांगावें.

**भावः स्वेशेनेक्षितो वा युतः स्यात्पापादन्यैर्वापि तस्यास्ति वृद्धिः । सौम्या यस्यांत्यास्तखस्वांबुगा वा पापैरेवं हानिरादेशनीया ॥ २ ॥**

प्रत्येक भाव आपल्या स्वामीनें, किंवा शुभग्रहांनीं युत, दृष्ट असेल तर त्याची वृद्धि होते. प्रश्नकालीं २।४।७।१०।१२ या स्थानीं शुभ ग्रह असल्यास शुभ होय. व पापग्रह वरील स्थानीं हानी करितात. प्रश्न ज्या भावाचा असेल तो भाव पहावा.

**पर्यायसंज्ञा चैतेषां कथ्यते मुनिसंमता ।**
**कार्यसंज्ञा च तस्योक्ता तस्मात्प्रश्नविचारणा ॥ ३ ॥**

प्रश्नविचार करण्याकरितां द्वादशभावांच्या पर्यायसंज्ञा, व त्या भावांवर कोणकोणतीं कार्यें पहावीं तें सांगतात.

**आरोग्य पूजा गुण कल्पवृत्तमायुर्वयोजातिरदोष सौख्यम् । क्लेशाकृती लक्षण रूप वर्णास्तद्भागिनेयस्य वधूस्तनौ स्यात् ॥ ४ ॥**

आरोग्य, पूजा, गुण, देह, वर्तन, आयुष्य, अवस्था, जाति, निर्दोषता, सुख, क्लेश, आकृती, लक्षण, रूप, वर्ण व भाच्याची स्त्री यांचा विचार प्रथमभावांत करावा.

**माणिक्य मुक्ताफल रत्न धातु द्रव्यांबर स्वर्णहयादि कार्यम् । रूप्यं सधान्यक्रयविक्रयादि साधारणं तद्भवति द्वितीये ॥ ५ ॥**

माणिक, मोतीं, रत्नें, धातु, द्रव्य, वस्त्र, सोनें, घोडे वगैरे, रुपें, धान्य यांची प्राप्ति, क्रय, विक्रय यासंबंधीं सर्वसाधारण विचार दुसऱ्या भावामध्यें करावा.

**स्नुषानुज क्षेम सुबुद्धि लाभ भृत्यादि दासी भटकर्मकर्तुः । भ्रात्रादिचिंताविषयं समग्रं पर्यायमेतत्कथितं तृतीये ॥ ६ ॥**

सून, भाऊ, क्षेम, सद्बुद्धि, लाभ, नोकर, दासी, युद्ध, भाऊ इत्यादिकांची चिंता यांचा विचार, तिसरेभावावर करावा.

गृहं निधानं विवरप्रवेशो महौषधक्षेत्रखलादि वाटी । सुहृज्जलं वै पितृपप्रयोगो गमागमौ ग्रामसुखादिकं च ॥ ७ ॥ स्थानच्युतिर्लाभगृहप्रवेशौ वृद्धिर्जनित्री जनकश्च तद्वत् । देशादिकार्याण्यपि लाभमस्य पर्यायमेतत्कथयंति तुर्ये ॥ ८ ॥

घर, निधि, गुहाप्रवेश, औषध, शेतबाग, मित्र, जल, पितृपति ( यम ) प्रयोग, जाणें येणें, ग्राम, सुख, स्थानच्युति, लाभ, गृहप्रवेश, वृद्धि, मातापिता, देश, इत्यादिक कार्यें व यांचे लाभ, हानी वगैरे विचार, चतुर्थभावावरून करावा.

नानाप्रयोगो विनयप्रबंध विनेय विद्या नयबुद्धिमंत्राः । संधान गर्भांग भवादिकं च प्रज्ञा सुतार्थस्य च पंचमे स्यात् ॥ ९ ॥

नानाविधप्रयोग, विनय, प्रबंध, विनेय, विद्या, नीति, बुद्धि, मंत्र, संधि, गर्भ, पुत्र, प्रज्ञा, पुत्रद्रव्य, यांचा विचार पंचमभावीं करावा.

अस्वास्थ्य दौस्थित्य विपक्षदासक्रूरोग्रकर्मा परकृत्य शंका । युद्धादि तन्मातुल माहिषाद्यं रोगोपि चिंत्यो रिपुभाव तुल्यः ॥ १० ॥

अस्वस्थता, खोटीदशा, शत्रु, दास, क्रूरत्व, उग्रता, शत्रुकृति, संशय, युद्ध, मामा, महिषी, रोग हीं सहाव्या भावावर अवलोकावीं.

वस्तुक्रय स्वास्थ्य वाणिज्य वाद कामोदयो दास कलत्र चौर्यम् । निवृत्ति स्वस्रेय गमागमाद्यं कलत्र पर्यायमिदं निरुक्तम् ॥ ११ ॥

वस्तूची किंमत, स्वस्थता, व्यापार, वाद, कामविकार, दास, स्त्री, चौर्य, निवृत्ति, भाचा, जाणें येणें वगैरे सप्तमभावीं पहावें.

आयुर्विरोधो निधनं च राज्यं भेदोथवा बंधुजनस्य छिद्रम् । वैषम्य दुर्गादि कलत्र शत्रुवधो नदीतारण मष्टमर्क्षे ॥ १२ ॥

ग्रंथ संग्रहालय
स्वतंत्र प्रत
सं. ज्यो नं. ९२/२५

आयुष्य, विरोध, मृत्यु, राज्य, भेद, बंधुजनाचा उणेपणा, वैषम्य, किल्ला, स्त्री, शत्रुवध, नद्युत्तारण, अष्टमांत पहावें.

**स्वाध्याय दीक्षा सुरगेहयात्रा नृपाभिषेको गुरु धर्म-कृत्यम् । जलाशय श्यालक देवरादीन् भ्रातुर्गृहिण्यो नवमस्य पूर्वैः ॥ १३ ॥**

वेदपाठ, दीक्षा, देवमंदीर व यात्रा, नृपाभिषेक, गुरु, धर्मकृत्य, जलाशय, श्यालक, दीर, भावजई यांचा विचार नवमस्थानीं करावा.

**आकाशवृत्तांत जलप्रपातः स्थानं पितुःकार्य सुखा दिमानम् । पुण्यं नृपत्वं च तथाधिकारो मुद्रा च्युति स्तद्दशमस्य तुल्यं ॥ १४ ॥**

आकाशांतील वर्तमान, पाऊस व पाणी पडणें, स्थानप्राप्ति, पितृ-कार्य, सुख वगैरे, मानप्राप्ति, पुण्य, राज्य, अधिकार, शिक्का, स्थानभ्र-ष्टता वगैरे दशमभावीं अवलोकावीं.

**कार्यस्यवृद्धिः क्रयवृद्धिलब्धिर्गजाश्व वस्त्रादिक यान शय्याः । स्वर्णानुवित्तापहृतादि कन्यालाभो गजा-देः श्वशुराद्यमाये ॥ १५ ॥**

कार्यवृद्धि, खरेदीमध्यें लाभ, हत्तीघोडे, वस्त्रें, वाहनें, शय्या, इत्या-दिकांची प्राप्ति, सुवर्णादि द्रव्यहानी, कन्यालाभ, श्वशुर वगैरे विचार अकराव्या स्थानांत पहावा.

**त्यागादि भोगेष्टि विवाहदान कृष्यादिकर्म व्यय संक्षतिश्च । पितृव्य मातृष्वसृ मातुलानी युद्धेक्षणं युद्धपराजयोंत्ये ॥ १६ ॥**

त्याग, भोग, इष्टि, विवाह, दान, शेती, खर्च, नाश, काका, माव-शीचा नवरा, मामी, युद्धदर्शन, पराजय, यांचा विचार बाराव्यास्थानीं पहावा.

**यद्यद्भावेषु यद्वस्तु कथितं यवनादिभिः ।
तत्कार्यसंज्ञमाख्यातं ततः प्रश्नविचारणा ॥ १७ ॥**

यवनादिक आचार्यांनीं ज्या ज्या भावांत जी जी वस्तु पहावी असें

सांगितलें आहे, त्या त्या वस्तूचें त्या त्या भावाला नांव आहे. अर्थात् त्या त्या वस्तूसंबंधीं त्या त्या भावांत प्रश्न पहावा.

यस्य भावस्य यद्वस्तु प्रश्नमात्रे प्रकाशितं ।
तत्पृच्छायां तु तल्लग्नमेवं वा पूर्ववद्भवेत् ॥ १८ ॥

ज्या भावाच्या वस्तुसंबंधीं प्रश्न आहे, त्या वस्तूचा जो भाव त्यालाच लग्न समजून त्यावरून प्रश्न पहावा.

यद्यद्भावेषु यत्कर्म तस्माल्लग्नव्यवास्थितिः ॥
अतीतानागतेकार्ये त्वतीतानागतादपि ॥ १९ ॥

ज्या भावांत जें कर्म सांगितलें आहे, त्या कर्माविषईं तो भाव हें लग्न झालेंच, परंतु त्या कर्माच्या भूत व भविष्यकालच्या प्रश्नांत त्या भावाचीं द्वादश व द्वितियस्थानें अनुक्रमें लग्नें समजावीं.

मूर्धोदये सौम्यविलग्नगे वा लग्नेपि वा सौम्ययुते शुभं स्यात् । अतोन्यथात्वे तु तदन्यथात्वं मिश्रं विमिश्रैराधिकं बलाढ्यैः ॥ २० ॥

शीर्षोदय ३।५।६।७।८।११ किंवा शुभग्रहाचें लग्न असेल, किंवा लग्नीं शुभग्रह असेल तर प्रश्नाचें फल शुभ सांगावें. याच्या उलट पृष्ठोदय १।२।४।९।१० व पापग्रहाचें लग्न असेल व लग्नीं पापग्रह असेल तर प्रश्नफल अशुभ जाणावें. मिश्रयोग असल्यास बलाबल पाहून मिश्रफल सांगावें.

केंद्रोपगा नवमपंचमगाश्च सौम्याः केंद्राष्टवर्ज्यमशुभास्त्रिषडाय संस्थाः । सर्वार्थसाधनकराः परिपृच्छतांस्यूरेभिर्विपर्ययगुणैस्तु विपर्ययः स्यात् ॥ २१ ॥

केंद्र व कोणस्थानीं शुभग्रह, केंद्राष्टमवर्जित ३।६।११ स्थानीं पापग्रह असल्यास पृच्छकाची कार्यसिद्धि होईल. याच्या उलट योग असल्यास कार्यहानी होईल असें सांगावें.

केंद्राधिनाथो यदि लग्नगःस्यात्तन्मित्रमेतस्य च केंद्रगं वा । व्ययाष्टकेंद्राण्यपहाय पापाश्चान्यत्र याता यदि तच्छुभं स्यात् ॥ २२ ॥

आयुष्य, विरोध, मृत्यु, राज्य, भेद, बंधुजनाचा उणेपणा. वैषम्य, किल्ला, स्त्री, शत्रुवध, नदुत्तारण, अष्टमांत पहावें.

**स्वाध्याय दीक्षा सुरगेहयात्रा नृपाभिषेको गुरु धर्म कृत्यम् । जलाशय श्यालक देवरादीन् भ्रातुर्गृहिण्यो नवमस्य पूर्वैः ॥ १३ ॥**

वेदपाठ, दीक्षा, देवमंदीर व यात्रा, नृपाभिषेक, गुरु, धर्मकृत्य, जलाशय, श्यालक, दीर, भावजई यांचा विचार नवमस्थानीं करावा.

**आकाशवृत्तांत जलप्रपातः स्थानं पितुःकार्य सुखा दिमानम् । पुण्यं नृपत्वं च तथाधिकारो मुद्रा च्युति स्तद्दशमस्य तुल्यं ॥ १४ ॥**

आकाशांतील वर्तमान, पाऊस व पाणी पडणें, स्थानप्राप्ति, पितृकार्य, सुख वगैरे, मानप्राप्ति, पुण्य, राज्य, अधिकार, शिक्का, स्थानभ्रष्टता वगैरे दशमभावीं अवलोकावीं.

**कार्यस्यवृद्धिः क्रयवृद्धिलब्धिर्गजाश्व वस्त्रादिक यान शय्याः । स्वर्णानुवित्तापहृतादि कन्यालाभो गजादेः श्वशुराद्यमाये ॥ १५ ॥**

कार्यवृद्धि, खरेदीमध्यें लाभ, हत्तीघोडे, वस्त्रें, वाहनें, शय्या, इत्यादिकांची प्राप्ति, सुवर्णादि द्रव्यहानी, कन्यालाभ, श्वशुर वगैरे विचार अकराव्या स्थानांत पहावा.

**त्यागादि भोगेष्टि विवाहदान कृष्यादिकर्म व्यय संक्षतिश्च । पितृव्य मातृष्वसृ मातुलानी युद्धेक्षणं युद्धपराजयोंत्ये ॥ १६ ॥**

त्याग, भोग, इष्टि, विवाह, दान, शेती, खर्च, नाश, काका, मावशीचा नवरा, मामी, युद्धदर्शन, पराजय, यांचा विचार बाराव्यास्थानीं पहावा.

**यद्यद्भावेषु यद्वस्तु कथितं यवनादिभिः ।**
**तत्कार्यसंज्ञमाख्यातं ततः प्रश्नविचारणा ॥ १७ ॥**

यवनादिक आचार्यांनीं ज्या ज्या भावांत जी जी वस्तु पहावी असें

सांगितलें आहे, त्या त्या वस्तूचें त्या त्या भावाला नांव आहे. अर्थात् त्या त्या वस्तूसंबंधीं त्या त्या भावांत प्रश्न पहावा.

**यस्य भावस्य यद्वस्तु प्रश्नमात्रे प्रकाशितं ।**
**तत्पृच्छायां तु तल्लग्नमेवं वा पूर्ववद्भवेत् ॥ १८ ॥**

ज्या भावाच्या वस्तुसंबंधीं प्रश्न आहे, त्या वस्तूचा जो भाव त्यालाच लग्न समजून त्यावरून प्रश्न पहावा.

**यद्यद्भावेषु यत्कर्म तस्माल्लग्नव्यवस्थितिः ॥**
**अतीतानागतेकार्ये त्वतीतानागतादपि ॥ १९ ॥**

ज्या भावांत जें कर्म सांगितलें आहे, त्या कर्माविषईं तो भाव हें लग्न झालेंच, परंतु त्या कर्माच्या भूत व भविष्यकालच्या प्रश्नांत त्या भावाचीं द्वादश व द्वितीयस्थानें अनुक्रमें लग्नें समजावीं.

**मूर्धोदये सौम्यविलग्नगे वा लग्नेपि वा सौम्ययुते शुभं स्यात् । अतोन्यथात्वे तु तदन्यथात्वं मिश्रं विमिश्रैरधिकं बलाढ्यैः ॥ २० ॥**

शीर्षोदय ३।५।६।७।८।११ किंवा शुभग्रहाचें लग्न असेल, किंवा लग्नीं शुभग्रह असेल तर प्रश्नाचें फल शुभ सांगावें. याच्या उलट पृष्ठोदय १।२।४।९।१० व पापग्रहाचें लग्न असेल व लग्नीं पापग्रह असेल तर प्रश्नफल अशुभ जाणावें. मिश्रयोग असल्यास बलाबल पाहून मिश्रफल सांगावें.

**केंद्रोपगा नवमपंचमगाश्च सौम्याः केंद्राष्टवर्ज्यमशुभास्त्रिषडाय संस्थाः । सर्वार्थसाधनकराः परिपृच्छतांस्युरेभिर्विपर्ययगुणैस्तु विपर्ययः स्यात् ॥ २१ ॥**

केंद्र व कोणस्थानीं शुभग्रह, केंद्राष्टमवर्जित ३।६।११ स्थानीं पापग्रह असल्यास पृच्छकाची कार्यसिद्धि होईल. याच्या उलट योग असल्यास कार्यहानी होईल असें सांगावें.

**केंद्राधिनाथो यदि लग्नगःस्यात्तन्मित्रमेतस्य च केंद्रगं वा । व्ययाष्टकेंद्राण्यपहाय पापाश्चान्यत्र याता यदि तच्छुभं स्यात् ॥ २२ ॥**

केंद्राधिपती लग्नीं असेल, किंवा केंद्राधिपाचा मित्र केंद्रीं असेल. व पापग्रह १२। ८ व केंद्रस्थानांहून अन्यत्र असतील तर पृच्छकास शुभफलप्राप्ति होईल.

**नरराशि लग्नमभिवीक्षितं शुभैरुदयास्त बंधु दशगैः शुभैस्तथा । त्रिकलाभषष्ठभगतैस्तथा शुभैः शुभलाभ वित्तविषयांस्तदा वदेत् ॥ २३ ॥**

नरराशीचें ३।६।७।९।११ लग्न शुभग्रहदृष्ट असेल, किंवा केंद्रीं शुभग्रह असतील, व ३।६।११ स्थानीं पापग्रह असतील तर धन लाभ वगैरे शुभफल प्राप्ती होईल.

**कन्या तुला च मिथुनं च घटो नृराशिश्चैतेषु सौम्यसहितेषु शुभं विभाव्यं । पापा व्ययाष्टभगता न शुभा विलग्ने पापः शशी न शुभदो दशमे शुभश्च २४**

लग्न नरराशीचें किंवा या नरराशि शुभग्रहयुक्त असतील, तर शुभफल. द्वादश व अष्टम पापग्रह अशुभ. लग्नीं चंद्र अशुभ. दशमचंद्र शुभ. हा चंद्र पूर्ण असल्यास फार उत्तम.

**चतुष्पदे वा द्विपदे विलग्ने पापग्रहस्थेन तदीक्षितैश्च । शुभग्रहैस्त्वीक्षित एव वृद्धिं नृराशिलग्ने तु शुभं समस्तं ॥ २५ ॥**

लग्न चतुष्पाद व द्विपादराशीचें असून पापग्रहयुक्त असल्यास. त्या पापग्रहांनीं दृष्ट अशा शुभग्रहांची लग्नीं दृष्टि असेल तर शुभ. नरराशीचें लग्न असल्यास शुभच होय.

**उदय तुहिन दीधिती भवेतां यदि च शुभैरभिवीक्षितौ तदानीम् ।शुभमशुभमतोन्यथेत्यभीष्टं गुणिगण मौलिमणेः शशिप्रभोस्तु ॥ २६ ॥**

लग्नावर व चंद्रावर शुभग्रहांची दृष्टि असेल तर शुभफल. लग्न व चंद्र पापग्रहदृष्ट असल्यास अशुभफल समजावें. याप्रमाणें गुणिगणचूडामणि चंद्रप्रभूचें शुभाशुभफल जाणावें.

॥ इति शुभाशुभाख्योद्वितीयोऽध्यायः ॥ २ ॥

## ॥ अथ लाभालाभाध्यायः प्रारभ्यते ॥ ३ ॥

लाभास्त पंच सहजेषु शुभग्रहाःस्युर्लाभप्रदा ददति
नेष्ट फलानि पापाः । स्थानं शुभा दशम सप्तमगाश्च
दद्यर्मानार्थदा द्वितय पंचम लग्नगाश्च ॥ १ ॥

३ । ५ । ७ । ११ या स्थानीं शुभग्रह असतील तर लाभ होईल. व वरीलस्थानीं पापग्रह असल्यास अनिष्ट फल मिळेल. तसेंच, दशम व सप्तमस्थानीं शुभग्रह असतील तर स्थानलाभ होईल. आणि १ । २ । ५ या स्थानीं शुभग्रह असल्यास मान व धन मिळेल.

चंद्रं सप्त दश द्वि षष्ठ सहजायस्थानसंस्थं शुभैः प
श्येद्वै प्रमदाकृतं शुभफलं लाभादिकं स्यात्तदा ॥ ल-
ग्नाष्ट त्रि नवात्मजेषु च भयं कार्यार्थ नाशोऽशुभैरे
तेष्वेव गताः शुभास्तु शुभदा मानार्थ संपत्तये ॥ २ ॥

शुभग्रहदृष्ट चंद्र २ । ३ । ६ । ७ । १० । ११ या स्थानीं असेल तर स्त्रीसंबंधीं शुभफल व लाभ देईल. आणि पापदृष्ट चंद्र १ । ३ । ५ । ८ । ९ या स्थानीं असल्यास भयप्रद व कार्य आणि अर्थ यांचा नाश करितो. याच पूर्वोक्तस्थानीं शुभग्रह मान व संपत्ती इत्यादि शुभफल देतात.

त्रिकोण केंद्रालयगाः शुभग्रहास्तथाऽशुभाश्च त्र्यरि
लाभगा यदि ॥ भवंति लाभाय तदाशु पृच्छतां
विपर्ययस्थास्तु न लाभदा अमी ॥ ३ ॥

केंद्रस्थानीं व कोणस्थानीं शुभग्रह, व पापग्रह त्रिषडायस्थानीं असतील, तर पृच्छकास लाभ होईल. याच्या उलट जर केंद्र, कोणीं, पाप व त्रिषडायीं शुभग्रह असतील, तर हानी होईल.

चंद्रश्चतुर्थे यदि सप्तमे शुभो विलग्नगो वा दशमे
विवस्वान् ॥ सद्योर्थलाभो मनुजस्य वाच्यस्तदेति
सत्यो बलिरेवमाह ॥ ४ ॥

चंद्र ४ । ७ स्थानीं, व सूर्य १ । १० स्थानीं असेल तर तत्काल लाभ होईल, असें सत्याचार्य व बली सांगतात.

वृषहर्यालिघटैः स्थानप्राप्तिं वदेन्न चरराशौ ॥
द्वितनौ लग्नोपगते चरस्थिरोक्तं फलं दलतः ॥ ७ ॥

प्रश्नलग्न स्थिरराशिंपैकीं असल्यास स्थानप्राप्ती. चरराशींपैकीं असल्यास स्थानहानि. द्विस्वभावराशीचें मिश्रफल.

॥ इति लाभालाभाध्यायस्तृतीयः ॥ ३ ॥

---

## ॥ अथ सामान्यगमागमाध्यायः प्रारभ्यते ॥ ४ ॥

स्थिरे विलग्ने न गमागमौस्तश्चरे विलग्ने तु विनिश्चितौ तौ ॥ मिश्रं फलं स्याद्वितनौ तदर्धे द्वये चरस्थावरवत्तदूह्यम् ॥ १ ॥

लग्न स्थिरराशीचें असल्यास जाणें येणें होणार नाहीं. लग्न चर असेल तर निश्चयेंकरून परदेशीं जाणें येणें होईल. लग्न द्विस्वभाव असल्यास मिश्रफल. ह्मणजे पूर्वार्धी चरलग्नासारखें व उत्तरार्धीं स्थिरवत् फळ सांगावें.

सूर सौरि गुरु सौम्य सितानामेककोपि चरलग्नगतश्चेत् ॥ आशुतर्हि गमनं स्पृहणीयं वक्रतामुपगतस्तु न हीति ॥ २ ॥

चरलग्नीं रवि, शनि, गुरु, बुध व शुक्र यांपैकीं कोणीही असेल तर त्वरीत गमन होईल. परंतु तो ग्रह वक्री असेल तर जाणें होणार नाहीं.

स्थिरराशि लग्नवर्ती गुरुबुधासितभास्करेषु यद्येकः ॥ गंतुः पथो निवृत्तिंजनयति निःसंशयं प्रश्ने ॥ ३ ॥

स्थिरलग्नीं गुरु, बुध, शुक्र, रवि यांपैकीं प्रश्नकालीं एकही ग्रह असेल तर गमन करणें होणार नाहीं.

रविर्वा गुरुर्वा बुधो वा सितो वा भवेदाद्यराशिस्थितः प्रश्नकाले ॥ गतिः पृच्छतः शीघ्रमेवाभिधेया निवृत्तिं पथोऽमीभिरंत्यालयस्थैः ॥ ४ ॥

ग्र. क्रो. ३४/ए
६०२६



प्रश्नलग्नापासून एकादशस्थानीं रवि, बुध, गुरु व शुक्र यांतून कोणीही ग्रह असल्यास पृच्छकाचें परदेशीं जाणें त्वरीत होईल. व जर या ग्रहांपैकीं कोणी द्वादशस्थानीं असेल तर मार्गांतून परत येणें होईल.

**सौरांगिरसौ पश्येदेकोपि वा स्थिरं समुद्यंतं ॥**
**प्रष्टाऽगमनं पृच्छेत्तस्याऽगमनं न वक्तव्यम् ॥ ५ ॥**

प्रश्नलग्न स्थिर असून त्यावर गुरूची किंवा शनीची पूर्ण दृष्टि असेल तर परदेशीं गेलला मनुष्य लौकर येणार नाहीं.

**षष्ठ त्रिकोण संस्थैः पापैश्च पापसंदृष्टैः ॥**
**गमागमौ न वाच्यौ स्थिरलग्ने चेचरे तु विपरीतं ॥ ६ ॥**

प्रश्नलग्न स्थिर असून ५।६।९ या स्थानीं पापदृष्ट पापग्रह असतील तर जाणें व येणें होणार नाहीं. व चरलग्न असून वरील योग असेल तर जाणें येणें होईल.

**चंद्रतोथ यदि वा विलग्नतो द्वादशद्वितयराशि गामिनः ॥ शुक्रवाक्पतिशशांकनंदनाः कागमाऽगम कथास्ति पृच्छतः ॥ ७ ॥**

प्रश्नलग्नापासून अथवा चंद्रापासून द्वितीय व द्वादशस्थानीं बुध, गुरु व शुक्र असतील तर परदेशीं जाणें व परदेशाहून येणें मुळींच होणार नाहीं.

**बलेन सर्वोत्तमतामुपागतो ग्रहो गृहे यावति लग्नतो भवेत् ॥ प्रवासतस्तत्समसंख्य मासतो निवर्तनं गंतुरसंशयं वदेत् ॥ ८ ॥**

प्रश्नकालीं सर्व ग्रहांत अधिक बलवान ग्रह लग्नापासून जितक्या स्थानांच्या अंतरावर असेल तितक्या महिन्यांनीं प्रवासास जाणारा व गेलेला मनुष्य घरीं परत येईल.

**चरांशकस्थे किल काल एष स्थिरांशके तद्द्विगुण स्तु वाच्यः ॥ द्विदेहलग्नांशगते ग्रहे तु विचिंतित स्तत्त्रिगुणो विधेयः ॥ ९ ॥**

वरील श्लोकांत सांगितल्याप्रमाणें तो बलवान ग्रह त्या स्थानीं पण चरनवांशीं असेल तर तेवढा काल, स्थिरनवांशीं असेल तर दुप्पट

व द्विस्वभावनवांशीं तिप्पट काल सांगावा.

यातुः पृच्छालग्नतः सप्तमस्य स्वामी यायाद्यावता वक्रभावं ॥ कालेनैति प्रस्थित स्तावतेति प्राहुस्त्वेते प्रश्नतत्त्वप्रवीणाः ॥ १० ॥

प्रश्नलग्नापासून सप्तमस्थानाचा स्वामी पुढें केव्हांतरी जर वक्री होण्याचा असेल तर त्यावेळीं प्रवासी परत घरीं येईल असें प्रश्नतत्ववेत्ते आचार्य सांगतात.

॥ इति सामान्य गमागमाध्यायश्चतुर्थः ॥ ४ ॥

---

## ॥ अथ शत्रुगमागमाध्यायः प्रारभ्यते ॥ ५ ॥

पापै रिपुस्थैर्यदि वा सुतस्थैर्निवर्तते वर्त्मत एव शत्रुः ॥ चतुर्थगैरंतिकसंगतोपि पराङ्मुखो गच्छति भग्नसैन्यः ॥ १ ॥

प्रश्नलग्नापासून पंचम अथवा षष्ठस्थानीं तीन किंवा जास्त पापग्रह असतील तर शत्रु मार्गातूनच परत माघारा जाईल. व चतुर्थस्थानीं पापग्रह असतील तर शत्रु जरी जवळ आला असला तरी त्याच्या सैन्याचा नाश होऊन तो पळून जाईल.

चतुर्थगैरलिघटमीनकर्कटैः पराजयो भवति शुभैर्विलोकनात् ॥ चतुष्पदैः पुनरिह तुर्यवर्तिभिः पलायते नियतमरातिरागतः ॥ २ ॥

प्रश्नलग्नापासुन चतुर्थ स्थानीं कर्क, वृश्चिक, कुंभ व मीन या राशीपैकीं एक, शुभग्रहदृष्ट असेल तर शत्रूचा पराजय होईल. व मेष, वृषभ, सिंह या चतुष्पद राशीपैकीं चतुर्थस्थानीं कोणी असल्यास, जवळ आलेला शत्रु पळून जाईल.

चरोदये भवति यदा शुभग्रहस्तदाभृशं जनयति यायिनां शुभं ॥ चरोदये त्वशुभ समन्वितेऽशुभं स्थिरोदये भवति शुभं व्यवस्थया ॥ ३ ॥

प्रश्नलग्न चर असून शुभग्रहयुक्त असेल तर शत्रूवर स्वारी करणाऱ्या राजाचें शुभ होईल. व चरलग्नीं अशुभग्रह असल्यास अशुभ होईल. तसेंच स्थिरलग्न शुभग्रहयुक्त असल्यास स्थायी राजाचें शुभ होईल. व स्थिरलग्नींअशुभग्रह असल्यास स्थायी राजाचा पराभव होईल. याप्रमाणें यायी व स्थायी राजांच्यासंबंधीं विचार करवा.

**स्थिरे शशांके चरराशिलग्ने नवांशके वास्यरिपुस्तदेति ॥ चरे शशांके स्थिरराशिलग्ने नवांशके तस्य तु वा गमःस्यात् ॥ ४ ॥**

स्थिरराशीस किंवा स्थिरनवांशीं चंद्र व चरराशीस किंवा चरनवांशीं लग्न असेल तर शत्रु चढाई करून येईल. याउलट चरचंद्र व स्थिरलग्न असेल तर शत्रु परत जाईल.

**शीतगौ द्वितनुराशिसंस्थिते लग्नतामुपगतो यदि स्थिरः ॥ शत्रुरेत्य विनिवर्ततेरिभे ज्ञेज्यशुक्रसहिते विनश्यति ॥ ५ ॥**

द्विस्वभावराशीचा चंद्र व स्थिरराशि लग्नीं असेल तर आलेला शत्रु परत माघारा जाईल. व याच योगावर षष्ठस्थानीं बुध, गुरु, किंवा शुक्र असेल तर शत्रूचा नाश होईल.

**लग्नेस्थिरे गुरुशनैश्चरदृष्टिदृष्टे शत्रोर्नवागमनमागमनं न वा स्यात् ॥ पापा स्त्रिपंचरिपुगा रिपुसंगमाय तुर्येस्थिताः पुनररातिनिवर्तनाय ॥ ६ ॥**

प्रश्नलग्न स्थिर असून त्यावर गुरु व शनीची दृष्टि असेल तर शत्रूचें आगमन किंवा गमन होणार नाहीं. पापग्रह तृतीय, पंचम व षष्ठस्थानीं असतील तर शत्रु समोर येऊन युद्ध होईल. व चतुर्थस्थानीं पापग्रह असल्यास शत्रु निघून जाईल.

**चंद्रश्चरे द्वितनुलग्नमथो पथोर्धमागत्य गच्छति रिपुर्द्वितनौ च चंद्रे ॥ लग्नेचरे रिपुरुपैति बलद्वयेन पापेक्षणाद्भवति तस्य पराजयोपि ॥ ७ ॥**

चंद्र चरराशीचा व लग्न द्विस्वभावराशीचें असेल तर शत्रु अर्ध मार्गांतून परत जाईल. व चंद्र द्विस्वभावराशीस आणि लग्न चर असल्यास शत्रु दुप्पट सैन्य घेऊन येईल. परंतु लग्न व चंद्र पापग्रहदृष्ट असतील तर शत्रूचा पराजय होईल.

**चंद्राकौं यदि हिबुके स्थितौ भवेतामत्युग्रं नहि परचक्रमभ्युपैति ॥ आक्रांतं गुरुबुधभार्गवैश्चतुर्थं स्थानं चेत्त्वरितमुपैत्यरिस्तदानीम् ॥ ८ ॥**

चंद्र व रवि चतुर्थ असतील तर शत्रुपरचक्र येणार नाहीं. आणि बुध, गुरु व शुक्र चतुर्थस्थानीं असतील तर शत्रु त्वरीतच येईल.

**सिंहाजकोदंडवृषा भवंति विलग्नगा वापि चतुर्थगा वा ॥ ग्रहेणयुक्ता यदि वा वियुक्ता ध्रुवं तदा तिष्ठति नैव शत्रुः ॥ ९ ॥**

प्रश्नलग्नीं किंवा चतुर्थस्थानीं मेष, वृषभ, सिंह,धनु यांपैकीं कोणि राशी असतील तर शत्रु सन्मुख रहाणार नाहीं.

**रवौ गुरौ वा स्थिरलग्नगामिनि स्थितो रिपुः स्वाश्रम एव निश्चलः ॥ रवौ गुरौ वाथ चरोदयस्थिते वदेदरातेरचिरात्समागमं ॥ १० ॥**

प्रश्नलग्न स्थिर असून त्यास्थानीं रवि किंवा गुरु असेल तर शत्रु स्वस्थानीं स्वस्थ राहील. चरलग्नीं वरील योग असल्यास शत्रूचें आगमन त्वरीत होईल.

**सुराचार्यदेवद्विषन्मंत्रिणौ द्वौ द्वितीये तृतीये यथा वा तथा वा ॥ तदा क्षिप्रमायात्यरातिः स्थिरस्थैर्न लग्नेश धर्मेश कर्मेश भेशैः ॥ ११ ॥**

गुरु व शुक्र प्रश्नलग्नापासून द्वितीय किंवा तृतीयस्थानीं अनुक्रमें किंवा एकत्र असतील तर शत्रु त्वरीतच येईल. परंतु लग्न, नवम व दशमस्थानाचे स्वामी ज्या राशींस असतील त्या राशींचे स्वामी स्थिरराशींत असल्यास शत्रूचें आगमन वरील योगानेंसुद्धां होणार नाहीं.

**यावत्संख्यं भवति रजनीनाथ गेहं विलग्नान्नैकोपि स्यान्नियतमनयोर्मध्यवर्तीग्रहश्चेत् ॥ तावत्संख्यैरपि**

गतदिनैः शत्रुरागच्छतीति ज्योतिर्विद्याविपुलगणक ग्रामणीरुद्गृणाति ॥ १२ ॥

प्रश्नलग्नापासून चंद्र जेवढ्या स्थानांच्या अंतरावर असेल, आणि त्यांच्यामध्यें,कोणि ग्रह नसेल तर, तेवढ्या स्थानांच्या इतक्या दिवसां-नीं शत्रु येईल असें चांगले ज्योतिषी सांगतात.

॥ इति शत्रुगमागमाध्यायः पंचमः ॥ ५ ॥

---

## ॥ अथ प्रवासचिंताध्यायः प्रारभ्यते ॥ ६ ॥

लग्नतः सहजपुत्रवित्तगा दूरगागमनशंसिनो ग्रहाः ॥ नष्टलंभनकराः शुभग्रहाः शीघ्रमागमकरौ तु मंत्रिणौ १

प्रश्नलग्नापासून द्वितीय, तृतीय व पंचमस्थानीं शुभग्रह असती-ल तर दूर गेलेला प्रवासी लौकर घरीं येईल. व हरवलेली वस्तू सांपडे-ल. विशेषतः गुरु किंवा शुक्र असल्यास शीघ्र सिद्धि.

बृहस्पतौ केंद्रगते तु कश्चन ग्रहो भवेत् षष्ठगतोथ सप्तमः ॥ भवेत्तदा प्रोषित पूरुषागमस्त्रिकोणगे चंद्र-सुते सितेपि वा ॥ २ ॥

प्रश्नकालीं केंद्रीं गुरु, व षष्ठ व सप्तमस्थानीं कोणी ग्रह असेल तर अथवा बुध किंवा शुक्र त्रिकोणांत असेल तर प्रवासी शीघ्र येईल.

अष्टमे शशिनि पापवर्जिते कंटके सुखमुपैति चाध्वगः ॥ कंटकास्थित शुभग्रहैः शुभं स्वं निवासमयमेति लाभ वान् ॥ ३ ॥

प्रश्नकालीं अष्टमांत चंद्र असून केंद्रांत पापग्रह नसतील तर प्रवा-सी सुखानें घरीं येईल. केंद्रांत शुभग्रह असल्यास द्रव्य घेऊन येईल.

पृष्ठे लग्ने पापदृष्टे वधो वा बंधो वा स्यात् सौम्यदृष्टे तु न स्यात् ॥ पापे षष्ठे केंद्रगे वा तृतीये नष्टो भ्रष्टः स्थानतः प्रच्युतो वा ॥ ४ ॥

देवज्ञवल्लभा

ग्रंथांतील

# अध्यायांची अनुक्रमणिका.


| क्रम. | अध्याय. | श्लोक. | पृष्ठ. |
|---|---|---|---|
| १ | प्रश्नावताराध्यायः | १३ | १ |
| २ | शुभाशुभाध्यायः | २६ | ३ |
| ३ | लाभालाभाध्यायः | ५ | ९ |
| ४ | सामान्यगमागमाध्यायः | १० | १० |
| ५ | शत्रुगमागमाध्यायः | १२ | १२ |
| ६ | प्रवासचिंताध्यायः | ११ | १५ |
| ७ | जयपराजयाध्यायः | २९ | १७ |
| ८ | रोगशुभाशुभाध्यायः | ८ | २४ |
| ९ | नष्टलाभालाभाध्यायः | १७ | २५ |
| १० | मनोमुष्टिचिंताध्यायः | १३ | २९ |
| ११ | वृष्टिनिर्णयाध्यायः | ४ | ३३ |
| १२ | विवाहनिर्णयाध्यायः | १३ | ३४ |
| १३ | गर्भस्त्रीपुंजन्मादिविचाराध्यायः | १२ | ३६ |
| १४ | प्रकीर्णाध्यायः | २१ | ३९ |
| १५ | लग्नचिंताध्यायः | २५ | ४४ |


अध्यायसंख्या १५ एकंदर श्लोकसंख्या २९९

भारतीय संस्कृतीचें श्रेष्ठत्व दाखविणारें
शास्त्रीय व तात्विक
**आर्यविज्ञान-मासिक.**

मार्गशीर्ष श. १८५१ पासून, ग्लेज ३२पृष्ठें, ऑर्टपेपरचें कव्हर, ज्यो. दप्तरी, प्रो. ताटके, वेदांततीर्थ वाटवेशास्त्री इत्यादींचे मराठी व संस्कृत शास्त्रीय उच्च लेख व कविता दर-महाचें राशिभविष्य वगैरेंसह नव्या थाटा-नें सर्वांगसुंदर असें निघूं लागलें. जाहिरा-तीस निम्मे दर ! वा. व. फक्त २ रु. मागवा.

गोमांतकांतील सर्वांगसुंदर छपाईचें एकच स्थल !
**संगमोदय-छापखाना.**

यांत, 'निर्णयसागरी' टाइपानें, मराठी, संस्कृत, पोर्तु-गीज व इंग्रजी वगैरे लहान मोठीं सर्व कामें योग्य मुदतींत, सुबक व स्वस्त दरांत करून दिलीं जातात.

वरील दोन्ही ठिकाणचा एकच पत्ताः—
व्यवस्थापक 'आर्यविज्ञान', संगमोदय
छापखाना मु. पो. सांगें, प्रां. गोवा.

प्रश्नलग्न पृष्ठोदय असून त्यावर पापग्रह पाहतील व शुभग्रह दृष्टि नसेल तर प्रवासांत गेलेला पुरूष बंधनांत असेल. पापयोग उत्कट असल्यास त्याचा नाश झाला असें समजावें. लग्नापासून तृतीय, षष्ठ व केंद्रस्थानीं पापग्रह असतील तर प्रवासी नाश पावेल. किंवा चोर त्याचें द्रव्य हरण करितील अथवा देशांतरास जाईल असें तारतम्यानें सांगावें. मिश्रयोगांत मिश्रफल.

**यथातथा यदि भवतः कथंचन द्वये त्रये सुरगुरुदैत्य-मंत्रिणौ ॥ प्रवासिनां भवति तदागमो नृणां तुरीयगौ भवति गृहप्रवेशदौ ॥ ५ ॥**

गुरु व शुक्र द्वितीय व तृतीयस्थानीं कसेही असतील तर प्रवासी शीघ्र येईल. चतुर्थस्थानीं असल्यास घरीं पोंचला असें सांगावें.

**पापकैः षष्ठलाभत्रिकस्थायिभिः सौम्यकैः किंच केंद्रत्रिकोणस्थितैः ॥ दूरगस्यागमो निर्विशंकंस्फुटं जल्पनीयो ग्रहग्रंथविद्भिः सदा ॥ ६ ॥**

प्रश्नलग्नापासून त्रिषडायस्थानीं पापग्रह व केंद्र त्रिकोणीं शुभग्रह असतील तर प्रवासी शीघ्र निःसंदेह घरीं येईल.


**अशुभर्क्षगतोऽशुभैश्च दृष्टश्चतुरस्त्रगृहेथवा त्रिकोणके ॥ दिवसेश्वरनंदनोऽध्वगानां नियतं शंसति बंधनं तदानीम् ॥ ७ ॥**

पापग्रहांच्या राशीस व पापदृष्ट असा शनी, लग्नापासून चतुर्थ, पंचम, अष्टम किंवा नवम असेल तर प्रवासी बंधनांत पडला आहे.

**शुभयुक्ते स्थिरलग्ने सुस्थिरबंधश्चरे त्वशुभयुक्ते ॥ क्षिप्रं भवति विमोक्षो द्वितनौ कालक्रमान्मोक्षः ॥ ८ ॥**

पूर्वोक्तयोगांत प्रश्नलग्न स्थिर असून शुभग्रहयुक्त असेल तर तें बंधन कायमचें असेल. लग्न चर असून अशुभग्रहयुक्त असल्यास त्वरीत बंधमुक्त होईल. लग्न द्विस्वभाव असून अशुभयुक्त असेल तर कांहीं कालानें बंधनांतून सुटका होईल.

**अरिभिरवलोक्यमानास्त्रिकोणयामित्रगाः पापाः ॥ पृष्ठोदयं विलग्नं सौम्यादृष्टं च पांथमरणाय ॥ ९ ॥**







# दैवज्ञवल्लभा

ग्रंथांतील

## अध्यायांची अनुक्रमणिका.


| क्रम. | अध्याय. | श्लोक. | पृष्ठ. |
|---|---|---|---|
| १ | प्रश्नावताराध्यायः | १३ | १ |
| २ | शुभाशुभाध्यायः | २६ | ३ |
| ३ | लाभालाभाध्यायः | ५ | ९ |
| ४ | सामान्यगमागमाध्यायः | १० | १० |
| ५ | शत्रुगमागमाध्यायः | १२ | १२ |
| ६ | प्रवासचिंताध्यायः | ११ | १६ |
| ७ | जयपराजयाध्यायः | २९ | १७ |
| ८ | रोगशुभाशुभाध्यायः | ८ | २४ |
| ९ | नष्टलाभालाभाध्यायः | १७ | २५ |
| १० | मनोमुष्टिचिंताध्यायः | १३ | २९ |
| ११ | वृष्टिनिर्णयाध्यायः | ४ | ३३ |
| १२ | विवाहनिर्णयाध्यायः | १३ | ३४ |
| १३ | गर्भस्त्रीपुंजन्मादिविचाराध्यायः | १२ | ३६ |
| १४ | प्रकीर्णाध्यायः | २१ | ३९ |
| १५ | लग्नचिंताध्यायः | २५ | ४४ |


अध्यायसंख्या १५ एकंदर श्लोकसंख्या २९९

भारतीय संस्कृतीचें श्रेष्ठत्व दाखविणारें
शास्त्रीय व तात्विक
**आर्यविज्ञान-मासिक.**

मार्गशीर्ष श. १८५१ पासून, ग्लेज ३२पृष्ठें, ऑर्टपेपरचें कव्हर, ज्यो. दप्तरी, प्रो. ताटके, वेदांततीर्थ वाटवेशास्त्री इत्यादींचे मराठी व संस्कृत शास्त्रीय उच्च लेख व कविता दर-महाचें राशिभविष्य वगैरेंसह नव्या थाटा-नें सर्वांगसुंदर असें निघूं लागलें. जाहिरा-तीस निम्मे दर ! वा. व. फक्त २ रु. मागवा.

गोमांतकांतील सर्वांगसुंदर छपाईचें एकच स्थल !
**संगमोदय-छापखाना.**

यांत, 'निर्णयसागरी' टाइपानें, मराठी, संस्कृत, पोर्तु-गिज व इंग्रजी वगैरे लहान मोठीं सर्व कामें योग्य मुदतींत, सुबक व स्वस्त दरांत करून दिलीं जातात.

वरील दोन्ही ठिकाणचा एकच पत्ताः—
व्यवस्थापक 'आर्यविज्ञान', संगमोदय
छापखाना मु. पो. सांगें, प्रां. गोवा.



प्रश्नलग्न पृष्ठोदय असून त्यावर शुभग्रहदृष्टि नसेल व पंचम सप्तम व नवमस्थानीं पापग्रह असून त्यांवर त्यांच्या शत्रूंची दृष्टि असेल तर प्रवासी मृत्यु पावला असें जाणावें.

**अध्वस्थाने सौम्यैरध्वा निरुपद्रवोऽध्वनीनस्य ॥**
**भयरोगपरिक्लेशाः पापैर्लग्नस्थितैस्तस्य ॥ १० ॥**

नवमस्थानीं शुभग्रह असेल तर जाणाऱ्याचा मार्ग सुखकर होईल व लग्नीं पापग्रह असतील तर त्याला भय, रोग व क्लेश प्राप्त होईल असें समजावें.

**गृहे ग्रहे यावति लग्नतो भवेत्तदा हता द्वादश राशयः स्फुटम् ॥ अवेहि तावद्दिवसैर्गतागमं निवर्तनं वक्रगतग्रहेण च ॥ ११ ॥**

वरील प्रश्नांत आगमनयोग करणारा ग्रह लग्नापासून जितक्या स्थानांच्या अंतरावर असेल त्या संख्येस बारांनीं गुणून येणाऱ्या गुणाकाराइतक्या दिवसांनीं प्रवासी घरीं येईल. किंवा सदरहू ग्रह जेव्हां वक्रगती होईल तेव्हां घरीं येईल असें इतर योगतारतम्यानें सांगावें.

॥ इति प्रवासचिंताध्यायः षष्ठः ॥ ६ ॥

---

## ॥ अथ जयपराजयाध्यायः प्रारभ्यते ॥ ७ ॥

---

**दशमसप्तमलग्नगताः शुभा नगरवासिनृपस्य जयप्रदाः ॥ शनिकुजौ नवमे भयभंगदौ विजयदा गुरुभार्गवचंद्रजाः ॥ १ ॥**

लग्न, सप्तम व दशमस्थानीं शुभग्रह असले तर नगरवासी राजाला जयप्राप्ति होईल. अर्थात् वरीलस्थानीं पापग्रह असल्यास पराजय होईल. प्रश्नलग्नापासून नवमस्थानीं शनि व मंगळ असतील तर नगरवासी राजाचा पराभव होऊन तो भयानें पळून जाईल. आणि त्याच नवमस्थानीं बुध, गुरु, शुक्र असतील तर त्याला विजयप्राप्ति होईल.

**नागराश्चक्रभागैस्तृतीयादितः प्रश्नलग्नाच्च धर्मादितो यायिनः ॥ तत्र सौम्येन जुष्टो जय प्राप्तिदः पापजुष्टस्तुभागो भवेद्भंगभाक् ॥ २ ॥**

प्रश्नकाली तृतीयस्थानापासून अष्टमस्थानापर्यंत सहा स्थानें नगरस्थित् राजाचीं व नवमस्थानापासून द्वितीयस्थानापर्यंत सहा स्थानें परचक्र आणणाऱ्या शत्रूंचीं. यांपैकीं ज्या भागांत शुभग्रहाधिक्य असेल त्याचा जय सांगावा. व पापग्रहाधिक्य असल्याचा पराजय होईल.

**मिश्रयुक्ते विमिश्रं फलं निर्दिशेत्तद्द्विरूपं फलं केचिदाचक्षते ॥ पंक्तिलाभव्ययस्थास्तु पापग्रहा यातुरिष्टाः परं तत्पुरस्याशुभाः ॥ ३ ॥**

पूर्वोक्त दोन्ही भागांत शुभ व अशुभग्रह असतील तर मिश्रफल. कोणी ज्योतिषी त्यांचें निरानिराळें फल सांगतात. प्रश्नकालीं दशम, एकादश व द्वादशस्थानीं पापग्रह असतील तर युद्धास चाल करून येणाऱ्या राजास शुभ. पण नगरस्थ राजास वाईट फल देतील. प्रश्नतारम्य पहावें.

**मिथुन तुला घट कन्या मेषाणामेकक्रोपि पापयुतः ॥ यदि भवति तदा विजयो गंतुः स्थास्नोर्भवेद्भंगः ॥४॥**

१।३।६।७।११ यांपैकीं एक जरी राशी पापग्रहयुक्त होईल तर येणाऱ्या राजाचा विजय व स्थायी राजाचा पराजय होईल.

**लग्ने नृराशिभवने यदि संति सौम्याः केंद्रव्ययाय भवनेष्वशुभा भवंति ॥ संधिस्तदा द्रुततरंप्रवदेन्नराणां पापैर्द्विदेहगृहगैस्तु विरोधमाहुः ॥ ५ ॥**

मिथुन, कन्या, तुळा, कुंभ या मनुष्यराशींचें लग्न असून तें शुभयुक्त असेल व केंद्र, लाभ, व्ययस्थानें पापयुक्त असतील, तर दोन्ही राजांचा परस्पर संधी ऐक्य होईल. पण द्विस्वभावराशीं (३।६।९।१२) पापयुक्त असतील तर त्यांचा विरोधच राहील.

**केंद्रस्थिता यदि शुभा यदि वा भवंति लग्ने नृराशिभवने शुभदृष्टिपुष्टः ॥ प्रीतिस्तदा भवति पापविलोकितैस्तु पापैरमीषु भवनेषु भवेद्विरोधः ॥ ६ ॥**

केंद्रस्थानीं शुभग्रह असतील व मनुष्यराशीचें लग्न शुभयुक्त व दृष्ट असेल तर दोनी राजांची प्रीति होईल. परंतु जर या योगांत हीं स्थानें पापग्रहयुत दृष्ट असतील तर विरोध होईल.

**अशुभग्रहस्थलग्ने बलिभिस्त्वशुभैश्च वीक्षिते युक्ते ॥
युद्धं महदादेश्यं क्षुद्रं सौम्यग्रहैर्दृष्टे ॥ ७ ॥**

पापग्रहांचें लग्न असून बलवान् पापग्रहांनीं युक्त किंवा दृष्ट असेल तर उभयतांमध्यें मोठें युद्ध होईल. व त्या लग्नावर शुभग्रहांची दृष्टि असल्यास थोडेंसें युद्ध होईल.

**सूर्यसमीरणसुरगुरुशुक्रान् समरे पृष्ठतः कृत्वा ॥
जयति परान्केवलमपि परमफलं प्राह यवनेंद्रः ॥ ८ ॥**

युद्धकाळीं सूर्य, वायु, गुरु व शुक्र यांनां पृष्ठभागीं करून युद्ध केलें असतां जयप्राप्त होतो. असें यवनाचार्य सांगतात.

**केंद्रगमर्कं केंद्री यदि शनिरुद्वीक्षते तदा भंगः ॥
एवंविध शनिदृष्टे मृत्युगतेऽर्के भवेन्मृत्युः ॥ ९ ॥**

केंद्रस्थ सूर्यावर केंद्रस्थ शनीची दृष्टि असेल तर युद्धांत पृच्छकाचा भंग होईल. तसेंच अष्टमांत सूर्य असून लग्नीं किंवा चतुर्थांत शनि असेल, किंवा शनी कुठेंही असून त्या रवीवर पूर्ण दृष्टीनें पाहील तर मृत्यु प्राप्त होईल.

**लग्ने रवावष्टमगे शशांके कुजार्कजाभ्यामवलोक्यमाने ॥ अर्केऽष्टमे लग्नगते च चंद्रे भंगो भवेत्प्रष्टुर संशयेन ॥ १० ॥**

लग्नीं रवि व अष्टमचंद्र किंवा अष्टमरवि व लग्नीं चंद्र असून त्या दोहोंवर मंगळ शनीची दृष्टी असेल तर निःसंदेह पृच्छकाचा युद्धांत भंग होईल.

**जीवज्ञसूर्यभृगुजास्तनया हि लोकदुश्चिक्यलग्नभवने परिपृच्छतः स्युः ॥ लाभस्थिताश्च शशिभास्करिभूमिपुत्रा यायी विजित्य रिपुमेति गृहं कृतार्थः ॥ ११**

प्रश्नकालीं गुरु, बुध, रवि व शुक्र; लग्न, तृतीय, चतुर्थ किंवा पंचम या स्थानांत असतील व लाभस्थानीं चंद्र, शनी व मंगळ असतील तर शत्रूवर स्वारी करणारा राजा शत्रूला जिंकून कृतार्थ होत्साता घरीं येईल.

लग्ने वा क्षितिसुतमंदयोः सुतस्थे जीवेऽर्के दशम
गृहाश्रिते विलग्नात् ॥ लाभे वा नभसि सितेंदुपुत्र
योर्वा प्रश्नैवं समिति रिपून्जयत्यवश्यम् ॥ १२ ॥

प्रश्नलग्नीं भौम किंवा शनि, पंचमगुरु, दशमसूर्य, दशमांत किंवा लाभांत बुध किंवा शुक्र, असा योग असेल तर स्वारीवर जाणारा राजा खात्रीनें शत्रूला जिंकील.

जीवतीव्रकरशीतमयूखैर्लग्नशत्रुदशगैर्जयसिद्धिः ॥
तद्वदेवगुरुभार्गवसूर्यैर्लग्नशत्रुदशगैरवधार्यम् ॥१३॥

प्रश्नलग्नीं गुरु, षष्ठस्थानीं रवि किंवा शुक्र व दशमस्थानीं चंद्र किंवा रवि असतील तर युद्धांत जय प्राप्ति होईल.

आये गुरौ स्यात्सचिवस्य लाभः कर्मस्थयोः सूर्यज
भौमयोश्च ॥ चतुर्थगे ज्ञेष्टमगेशशांके जायास्थिते
चापि भृगौ जयः स्यात् ॥ १४ ॥

प्रश्नकालीं लाभस्थानीं गुरु, व दशमांत शनिभौम असतील तर उत्तम मंत्री मिळेल. चतुर्थबुध, अष्टमचंद्र व सप्तमशुक्र असेल तर युद्धांत जय प्राप्त होईल.

दशमगेहगते क्षितिनंदने किरणमालिनि लाभ
गृहं गते ॥ सहजगेऽर्कसुते रिपुगे विधौ तदितरैरुद-
यालयगैर्जयः ॥ १५ ॥

प्रश्नकालीं दशमभौम, एकादशरवि, तृतीयशनि, षष्ठचंद्र व इतर ग्रह लग्नीं असतील तर जयप्राप्ति होईल.

भूमिनंदनतीव्रभानु शनैश्चरैः सहजस्थितैः लग्नगै
श्च शुभग्रहैरिह पृच्छतां विजयः स्फुटः ॥ लग्नशालि
नि वा गुरौ विशुभैस्तु लाभ गृहागतैः कर्मगैरथवा ज-
यो भवतीति चाह पराशरः ॥ १६ ॥

प्रश्नकालीं मंगळ, रवि, शनि, तृतीयस्थानीं व शुभग्रह लग्नीं असतील, अथवा लग्नीं गुरू व पापग्रह दशम व एकादशस्थानीं असतील तर विजय प्राप्ति होईल. — पराशरः

3080

क्षितिसुतसूर्यसुतौ यदि षष्ठे सुरगुरुचंद्रमसौ च विलग्ने ॥ शशिसुतदैत्यगुरू यदि चाये दिवसकरो दशमश्च जयाय ॥ १७ ॥

प्रश्नकालीं मंगळ व शनि षष्ठस्थानीं, गुरु व चंद्र लग्नीं, बुध व शुक्र लाभस्थानीं व सूर्य दशमस्थानीं असेल तर युद्धांत पृच्छकास विजयप्राप्ति होईल.

नवमात्मजलग्नगैरिह स्याच्छनिशीतांशुकुजैर्नृपस्य भंगः ॥ वसुधासुतदृष्टयोर्विलग्ने शशभृन्मंदगयोर्भवेच्च मृत्युः ॥ १८ ॥

प्रश्नकालीं नवमशनि, पंचम चंद्र व लग्नीं मंगळ असेल तर युद्धांत भंग होईल. तसेंच, लग्नीं चंद्र व शनि असून त्यांवर मंगळाची दृष्टि असेल तर युद्धांत मृत्यु येईल.

अष्टमे कुजयुते शनैश्चरे लग्नगे च मरणं दिवाकरे ॥ त्र्यायमृत्युषु च रोहिणीपतौ स्याद्वधः समिति भास्करानुगे ॥ १९ ॥

प्रश्नकालीं भौम व शनि अष्टमांत व रवि लग्नीं असेल किंवा तृतीय, एकादश, अष्टम, रवि व चंद्र असतील तर युद्धांत मृत्यु येईल.

कुजबुधशनिभिः स्मरस्थितैर्भवति रिपूनय गच्छतो वधः ॥ उदयगृहगयोः सितारयोरपि च रिपूपचयक्षुधा मृतिः ॥ २० ॥

प्रश्नकालीं मंगळ, बुध व शनि सप्तमांत असतील तर शत्रूवर स्वारी करून जाणारा राजा मृत्यु पावेल. तसेंच लग्नीं शुक्र व मंगळ असतील तर अन्नाची टंचाई पडून भुकेनें मृत्यु पावेल व शत्रू बलाढ्य होईल असें सांगावें.

विज्ञेयाः क्षितिसुतमंदयोर्विलग्ने षष्ठर्क्षे बुधसित योरिहाष्टमर्क्षे ॥ तीक्ष्णांशोर्ध्रुवमिति पापिनो रिपूणां संग्रामे पटुतरमंत्रिणो वधाय ॥ २१ ॥

प्रश्नलग्न भौम किंवा शनीचें क्षेत्र, षष्ठस्थान बुध किंवा शुक्रक्षेत्र, अष्टमस्थान रविक्षेत्र असून त्या त्या स्थानीं पापग्रह असतील तर युद्धांत बुद्धिमान मंत्री नाश पावेल.

**विलग्नात्मजस्थानसंस्थैरवश्यं वधं प्रष्टुपुत्रस्य जानीहि पापैः ॥ स चंद्रे कुजे लग्नगे सौरिदृष्टे पुनः संगरे भंग एव प्रादिष्टः ॥ २२ ॥**

प्रश्नलग्नीं व पंचमस्थानीं पापग्रह असतील तर युद्धांत पुत्राचा नाश होईल व लग्नीं चंद्र मंगळ असून त्यांवर शनीची दृष्टि असेल तर युद्धांत पराजय होईल.

**द्युन नैधनगते सितद्युतौ लग्नगामिनि च तीक्ष्ण दीधितौ ॥ गच्छतः सामिति वा विपर्यये त्रास भंग मरणागमाध्रुवम् ॥ २३ ॥**

प्रश्नकालीं सप्तम किंवा अष्टमस्थानीं चंद्र व लग्नीं रवि असेल तर युद्धांत त्रास, भंग व मृत्यु प्राप्त होईल.

**द्वित्रिकेंद्रास्थितैः पापरूपैर्ग्रहैः शक्तिहानिं वहद्भिः स्वकीयांशुभिः ॥ अष्टमस्थे निशानायके भूभुजां बंधनाशात्ययाः स्यू रणेपृच्छताम् ॥ २४ ॥**

प्रश्नकालीं द्वितीय, तृतीय व केंद्रस्थानीं अस्तंगत पापग्रह असतील व चंद्र अष्टम असेल तर बंधन व मृत्यु प्राप्त होतील.

**द्युने महीनंदनचंद्रयोःस्याद् बुधार्कलग्ने स्वबलस्य भेदः ॥ यमारयोस्तद्वदवेहि भंगं युद्धे बुधा हस्करयोस्तथैव ॥ २५ ॥**

प्रश्नकालीं सप्तमस्थान हें मंगळ किंवा चंद्राची राशि असेल व लग्नीं बुध किंवा रवीची राशि असेल तर पृच्छकाच्या सैन्यांत फितुरी होईल. तसेंच सप्तमांत शनिमंगळ राशि व लग्नीं बुधरविराशि असल्यास पराजय होईल.

**सर्वैरमीभिर्नवमस्थितैस्तु हन्यान्नृपो मंत्रिपुरोहितादीन् ॥ अत्रैव योगे च राशी विलग्ने सदेशि-**

काश्वस्थपति स्वपुत्रान् ॥ २६ ॥

प्रश्नकालीं पूर्वश्लोकोक्त रवि, मंगळ, शनि व बुध हे ग्रह नवमस्थानीं असतील तर मंत्रिपुरोहितासह राजा नाश पावेल. व यान्त्र योगांत जर चंद्र लग्नीं असेल तर गुरू, अश्व, शिल्पि व आपले पुत्र यांसह राजनाश होईल.

**अर्कसूर्यसूतयोश्च विलग्ने दृष्टयोश्च धरणीतनयेन ॥ अस्तगे शशधरे बलहीनैर्वाहिनीपति वधः किल सौम्यैः ॥ २७ ॥**

प्रश्नलग्नीं रवि व शनि असून त्यांवर भौमदृष्टि असेल व चंद्र सप्तमांत असेल व शुभग्रह बलहीन असतील तर पृच्छकराजाच्या सेनापतीचा नाश होईल.

**अस्तगे शशिनि लग्नगे रवावष्टमे कुजशनैश्चरौ यदा ॥ ज्ञस्तृतीयगृहगस्तदा रणे मंत्रिणा सह विहन्यते नृपः ॥ २८ ॥**

प्रश्नकालीं सप्तमचंद्र, लग्नीं रवि, अष्टमीं मंगळ व शनि, तृतीय बुध असेल तर प्रधानासह राजा नाश पावेल.

**शीर्षोदयं शुभ सुहृद्ग्रहयुक्तदृष्टं लग्नं शुभा बलयुताः शुभवर्ग लग्ने ॥ सर्वार्थसिद्धिद मतोन्यदनिष्टमेव प्रस्थान जन्मफलयुक्तिभिरन्यदूह्यम् ॥ २९ ॥**

प्रश्नलग्न मिथुन, सिंह, कन्या, तुला, वृश्चिक व कुंभ या शीर्षोदय राशींपैकीं असावें. लग्नीं शुभषड्वर्गाधिक्य असावें. लग्नावर शुभग्रह व मित्रग्रह असावे किंवा त्यांची पूर्ण दृष्टी असावी. व शुभग्रह बलवान् असावे ह्मणजे पृच्छकाचे सर्व हेतु पूर्ण होतील. या उलट पृष्ठोदय लग्न, पापषड्वर्गाधिक्य लग्न अशुभग्रहयुत व दृष्ट व पापग्रह बलवान् असतील तर अनिष्ट फल. विशेष विचार यात्रा मुहूर्त व जातक ग्रंथ यांवर करावा.

॥ इति जयपराजयाध्यायः सप्तमः ॥ ७ ॥

## ॥ अथ रोगशुभाशुभाध्यायः प्रारभ्यते ॥ ८ ॥

**लग्नस्थितो वाष्टमसंस्थितो वा पापग्रहो यस्य तु जन्मराशिम् ॥ निरीक्षते तस्य गदार्दितस्य निःसंशयं मृत्युमुदाहरंति ॥ १ ॥**

प्रश्नलग्नीं किंवा अष्टमस्थानीं पापग्रह असून, तो रोगी मनुष्याच्या जन्मराशीस जर पूर्ण दृष्टीनें पाहील, ह्मणजे प्रश्नलग्नकुंडलींत ज्या स्थानीं रोग्याच्या राशीचा अंक येईल, त्या स्थानीं पाहील तर त्याला निःसंदेह मृत्यु येईल.

**पृष्ठोदये विलग्ने क्रूराः केंद्रेऽष्टगः शशी यस्य ॥ रोगार्तस्य विनाशो दृष्टे वा बलयुतैः पापैः ॥ २ ॥**

प्रश्नलग्नीं पृष्ठोदयराशी असून, केंद्रीं क्रूर ग्रह व अष्टमीं चंद्र असेल, किंवा लग्नावर, बलवान् पापग्रहांची दृष्टी पूर्ण असेल तर रोगी मनुष्याला मृत्यु प्राप्त होईल.

**शशिनं शशिपुत्रं वा पश्यति पापो विलग्नगेहस्थम् ॥ आदेष्टव्यः प्रष्टुः कष्टो व्याधिर्नसंदेहः ॥ ३ ॥**

प्रश्नलग्नीं चंद्र किंवा बुध असून, त्यावर पापग्रहाची पूर्णदृष्टी असेल, तर रोगी कष्टसाध्य आहे असें सांगावें.

**सौम्यग्रहा यदि सुतस्मर मृत्युसंस्था पापा भवंति च शुभग्रह दृश्यमानाः ॥ आयात्रिषड्दशमगश्च निशाकरःस्यात्तस्माच्छुभाश्च यदि वा शुभमाहुरस्य ४**

प्रश्नलग्नापासून ५।७।८ या स्थानीं शुभग्रह असतील, पाप ग्रहांवर शुभग्रह पूर्णदृष्टीनें पाहतील, व ३।६।१०।११ या स्थानीं चंद्र असेल, तसेंच चंद्रापासून वरील चारी त्रिषड्दशाय ३।६।१०।११ स्थानीं शुभग्रह असतील, तर रोग्याला आरोग्य व शुभफल मिळेल.

**पापेक्षितः पापयुतः शुभानां दृग्योगहीनो नवमः शनिश्चेत् ॥ तदा रुजार्तः परदेशगःस्यात् षष्ठाष्टमे मृत्युकरस्त्ववश्यम् ॥ ५ ॥**

परदेशीं असलेला व आजारी आहे असा निरोप समजलेला मनुष्य आतां कसा आहे, असा प्रश्न असल्यास, प्रश्नलग्नापासून पापग्रह युक्त व दृष्ट असा शनि नवमांत असून, त्यावर शुभदृष्टि नसेल, तर परदेशस्थ मनुष्य रोगपीडित आहे. व तसाच शनि षष्ठ किंवा अष्टम असेल तर मृत्युयोग.

**उपचयगृहगे चंद्रे शुभेषु केंद्रत्रिकोणनिधनेषु ॥**
**शुभदृष्टे वा लग्ने रोगी देशांतरे नीरुक् ॥ ६ ॥**

प्रश्नकालीं चंद्र ३।६।१०।११ या उपचयस्थानीं असून, केंद्र १।४।७।१०, कोण ५।९ व अष्टमस्थानीं शुभग्रह असतील तर परदेशीं असलेला रोगी आरोग्य पावेल.

**लग्नगतः परिपूर्णो रजनीजानिर्विलोकितो गुरुणा ॥**
**केंद्रे वा गुरुभृगुजौ रोगार्तस्तत्र नीरोगः ॥ ७ ॥**

प्रश्नलग्नीं गुरुदृष्ट असा पूर्णचंद्र असेल, किंवा केंद्रीं गुरु व शुक्र असतील तर रोग्याला त्वरीत आरोग्य मिळेल.

**प्रश्नश्चेत्स्थिरलग्ने तदा न मरणं न रोगशांतिर्वा ॥**
**चरलग्ने विपरीतं द्विदेहलग्ने तु पूर्वमिव ॥ ८ ॥**

रोगप्रश्न स्थिर २।५।८।११ लग्नावर असेल तर रोगशांति होणार नाहीं व मरणही येणार नाहीं. तसेंच, प्रश्नीं १।४।७।१० हीं चरलग्नें असतील तर रोग शमेल, किंवा मरण येईल. द्विस्वभावलग्नाचें फल पूर्वार्धीं स्थिरवत् व उत्तरार्धीं चरवत् सांगावें. किंवा स्थिरलग्नाप्रमाणें.

॥ इति रोगशुभाशुभाध्यायोऽष्टमः ॥ ८ ॥

---

## ॥ अथ नष्ट लाभाऽलाभाध्यायः प्रारभ्यते ॥ ९ ॥

---

**स्थिरोदये वा यदि वा स्थिरांशे वर्गोत्तमे वा यदि वा विलग्ने ॥ तत्रैव तचोरितमस्ति वस्तु स्वकेन केनापि चरे परैस्तु ॥ १ ॥**

प्रश्नलग्न स्थिरराशीचें असेल, किंवा अंश स्थिरराशीचा. अथवा वर्गोत्तम ह्मणजे लग्न व अंश एक राशीचे असतील, तर नष्ट वस्तु आप ल्याच मनुष्यानें चोरिली असून, त्याचजागीं आहे. व लग्न व अंश चर असतील, तर दुसऱ्यानें चोरिली.

**द्विशरीरराशिलग्ने प्रतिवेशिजने न हृतमुदाहार्यं ॥ तत्रस्थं स्थिरराशौ चरराशौ तच्च संचलितम् ॥ २ ॥**

प्रश्नलग्न द्विस्वभाव असेल तर, शेजारी मनुष्यानें चोरिली आहे. तसेंच, लग्न स्थिर असल्यास त्याचस्थानीं आहे. व चर लग्न असेल तर नष्टवस्तु दुसरीकडे गेली असें जाणावें.

**लग्ने प्रजाते द्वितनौ हृतं स्वं गृहाद्वहिर्निर्गमितं विचिंत्यं ॥ हर्ता सवीर्यास्तगखेटतुल्यो नौजे नृदृष्टे द्यिताऽन्यथातः ॥ ३ ॥**

प्रश्नलग्न द्विस्वभाव असल्यास, चोरीस गेलेलें धन, घराबाहेर गेलें. सप्तमस्थानीं जो बलवान् ग्रह असेल, त्याच्या जाति, वर्ण, गुण, आकृतीप्रमाणें, चोराची जाति वगैरे सांगावी. प्रश्नलग्न विषम असून, पुरुष ग्रहांनी दृष्ट असेल, किंवा तो सप्तमस्थानीं असलेला ग्रह, विषमराशीस व पुरुषग्रहदृष्ट असेल, तर चोर, पुरुष आहे. प्रश्नलग्न, सम, स्त्रीग्रहदृष्ट व सप्तमस्थित ग्रह, समराशीस असल्यास चोर स्त्री आहे.

**लग्नांशकादपहृतद्रविणस्य जातिर्द्रेष्काणतस्तदपहर्तृजनस्वरूपं ॥ दिग्देशकालकलनं किल राशितः स्याल्लग्नांशकाद्भवति जातिवयो विभागः ॥ ४ ॥**

प्रश्नकालीं लग्नाचा जो नवांश असेल, त्यावरून चोरीस गेलेल्या वस्तूची जाति सांगावी. चालू द्रेष्काणावरून, चोराचें स्वरूप सांगावें. लग्न ज्या राशीचें आहे, त्या राशीवरून दिशा, देश व काल यांचा विचार करावा. व पुनः नवांशावरून चोराची जाति, वय सांगावें.

**वयांसि तेषां स्तनपानबाल्यव्रतास्थिता यौवनमध्यवृद्धाः ॥ अतीव वृद्धा इति चंद्रभौमज्ञशुक्रजीवार्कशनैश्चराणाम् ॥ ५ ॥**

ग्रहांवरून वय ठरविण्याचें येणें प्रमाणें— चंद्र-स्तनपानयोग्य १.

मंगळ- बाल्यत्व २, बुध- व्रतबंधयोग्य ३, शुक्र-तारुण्य ४, गुरु- मध्यमवय ५, रवि- वृद्ध ६, शनि- अतिवृद्धत्व ७ असें जाणावें.

**रवींदुयुक्ते शनिभौमदृष्टे सिंहोदयेऽन्धः किल तस्करः स्यात् ॥ वामेन काणः शशिनि व्ययस्थे स चक्षुषान्येन रवौ व्ययस्थे ॥ ६ ॥**

प्रश्नकालीं सिंहलग्न असून, लग्नांत सूर्य व चंद्र असतील व शनि व भौम यांची त्यांवर पूर्ण दृष्टि असेल, तर चोर आंधळा आहे. तसेंच लग्नापासून व्ययस्थानीं चंद्र असेल तर, चोर डाव्या डोळयानें आंधळा व व्ययस्थानीं सूर्य असल्यास, उजव्या डोळयानें आंधळा.

**क्रूरः षष्ठः क्रूरराशौ विलग्नाद्यस्मिन्राशौ तत्प्रदेशे व्रणोस्य ॥ एवं प्रोक्तं यन्मया जन्मकाले चिन्हं रूपं तत्तदस्मिन्विधेयं ॥ ७ ॥**

प्रश्नलग्नापासून षष्ठस्थानीं, क्रूर ह्मणजे विषमराशीस, क्रूर ग्रह असेल तर तो राशी कालपुरुषाचें जें अंग असेल, त्या अंगास व्रण असलेला चोर असेल. शिवाय, माझ्या (बृहज्जातक) ग्रंथांत जन्मकालीं ज्या चिन्हादिकांचा विचार केला आहे तो येथेंही जाणावा.

**आद्ये हृतं निपतितं तदनु द्वितीये द्रव्यं च विस्मृतमथो यदि वा तृतीये ॥ द्रेष्काणकेषुपरिकल्प्यामिदं क्रमेण वाच्यं हृतं तदपि वेश्ममुखेंतरेंत्ये ॥ ८ ॥**

लग्नाच्या पहिल्या द्रेष्काणीं प्रश्न असेल तर, चोरी खरी झाली आहे. दुसऱ्या द्रेष्काणीं प्रश्न असल्यास द्रव्य चोरलें नाहीं, तर कुठें तरी पडलें आहे. व तृतीय द्रेष्काणीं कुठें ठेवलेल्याची विस्मृती झाली आहे, पण जर चोरी झालीच तर द्रव्य दूर न जातां घराच्या दाराआंतच आहे किंवा जवळ आहे असें समजावें.

**ग्रहैर्दिशः केंद्रगतैर्विचिंत्य विलग्नराशेस्तदसंभवे वा ॥ विलग्नमध्याच्चलितैर्नवांशैर्विचिंतनीयानि हि योजनानि ॥ ९ ॥**

प्रश्नकालीं केंद्रांत जो वलिष्ठ ग्रह असेल त्याच्या दिशेस नष्टद्रव्य गेलें आहे. किंवा लग्नीं जो राशी असेल त्याच्या दिशेस गेलें आहे. लग्नाच्या भुक्त नवांशांइतक्या योजनांवर द्रव्य गेलें असें सांगावें.

**शुक्रे धने देवगुरौ व्ययस्थे मूर्तौ शुभे वा हृत लब्धिरुक्ता ॥ होरेंदुयुक्तालयदिङ्मुखेषु सूर्येण लग्ना धिपराशि भूमौ ॥ १० ॥**

प्रश्नकालीं धनस्थानीं शुक्र, व्ययस्थानीं गुरु व लग्नीं शुभग्रह असल्यास नष्ट झालेलें धन मिळेल. लग्नीं चंद्र असल तर, नष्ट वस्तु लग्नराशीच्या दिशेस व सूर्य असल्यास लग्नाधिपग्रहदिशेस मिळेल असें सांगावें.

**पूर्णः शशी यदि विलग्नगतः शुभो वा शीर्षोदये यदि पुनः शुभदृष्टि दृष्टः ॥ लाभस्थितो बलयुतो यदि वा शुभः स्यात् नष्टस्य लाभमचिरेण ततः करोति ११**

शीर्षोदय अशा प्रश्नलग्नीं शुभग्रहदृष्ट असा पूर्ण चंद्र किंवा शुभग्रह असेल अथवा लाभस्थानीं बलयुक्त शुभग्रह असेल तर नष्ट द्रव्याचा शीघ्र लाभ होईल असें सांगावें.

**लग्नात्द्वितीये यदि वा तृतीये शुभेन युक्ते हिबुके.थवा स्यात् ॥ सौम्यैः सुहृत्सप्तदशास्थितैर्वा निःसंशयं चोरित वस्तुलाभः ॥ १२ ॥**

प्रश्नलग्नापासून द्वितीय, तृतीय, चतुर्थ या स्थानीं शुभग्रह असतील, किंवा चतुर्थ सप्तम व दशम या तीनही स्थानीं शुभग्रह असतील तर चोरीला गेलेल्या वस्तूचा लाभ निःसंशय होईल.

**लग्ने संपूर्णतनुर्जीवेन सितेन वीक्षितश्चंद्रः ॥ केंद्रोपचयस्थैर्वा सौम्यैर्धनगैस्तथैवाप्तिः ॥ १३ ॥**

प्रश्नलग्नीं पूर्ण चंद्र असून त्यावर गुरु किंवा शुक्र पहात असेल किंवा केंद्रीं १।४।७।१० उपचयीं ३।६।१०।११ आणि धनस्थानीं शुभग्रह असतील तर नष्ट द्रव्य प्राप्ति होईल.

**लग्ने पूर्णश्चंद्रो जीवःशुक्रोबुधोपि वा भवति ॥ लभतेपहृतं द्रव्यं शुभयुक्ते सप्तमे यदि वा ॥ १४ ॥**

लग्नीं व सप्तमस्थानीं पूर्णचंद्र, बुध, गुरु किंवा शुक्र असेल तर चोरीस गेलेलें द्रव्य हटकून मिळेल असें जाणावें.

**लग्नात्पातालाद्वा द्वितीयगो वा तृतीयस्थः ॥ भवति शुभग्रहश्चेन्नूनं नष्टं धनं लभते ॥ १५ ॥**

प्रश्नलग्नापासून किंवा चतुर्थापासून द्वितीय अथवा तृतीयस्थानीं शुभग्रह असेल तर नष्टधनलाभ होईल.

**पापविलग्नं पापे पश्यति नष्टं विनष्टमेव स्यात् ॥ शुभ खगलग्ने तु शुभैर्दृष्टे नष्टाप्तिरेष्टव्या ॥ १६ ॥**

प्रश्नलग्न पापग्रहांचें असून पापदृष्ट असेल तर नष्टवस्तु मिळणार नाहीं. व लग्न शुभग्रहाचें शुभदृष्ट असेल तर मिळेल.

**सिंहालिकुंभा यदि पापवीक्षिता युताः स्मरस्थाः स्वनवांशगामिनः ॥ तदा विनष्टं त्वथवा बलान्विते कुजेष्टमस्थे यदि तन्नवांशे ॥ १७ ॥**

प्रश्नलग्नापासून सप्तमस्थानीं सिंह, वृश्चिक, कुंभ यांपैकीं राशी असून त्या आपल्या नवांशीं असतील व तेथें पापग्रह असतील किंवा पाहतील, किंवा अष्टमस्थानीं पूर्वोक्त सिंहादि नवांशीं बलिष्ठ मंगळ असेल तर नष्ट झालेलें द्रव्य मिळणार नाहीं असें जाणावें. प्रश्नलग्नाचे जेवढे अंश भोगले असतील तेवढेच सप्तमराशीचे अंश भोगले असें समजून त्यावरून नवांश जाणावा.

॥ इति नष्टवस्तु लाभालाभाध्यायो नवमः ॥ ९ ॥

---

## ॥ अथ मनोमुष्टिचिंताध्यायः प्रारभ्यते ॥ १० ॥

**लग्नस्थः शनिबुधवीक्षितः सुधांशुश्चांद्रिर्वा कथयति चिंतितां कुमारीं ॥ वृद्धां स्त्रीं शनिरिनगीष्पती प्रसूतां शुक्रारावथ तरुणीं नरेपिचैवम् ॥ १ ॥**

प्रश्नलग्नीं शनीची किंवा बुधाची दृष्टि असलेला चंद्र किंवा शनीची दृष्टि असलेला बुध असेल तर पृच्छकाला कन्येसंबंधीं चिंता आहे.

लग्नीं बुधदृष्ट शनी असेल तर वृद्ध स्त्रीची चिंता. शनी किंवा बुधदृष्ट असे रवि व गुरु असल्यास प्रसुता स्त्रीची चिंता. तसेंच शनि व बुध दृष्ट लग्नीं शुक्र मंगळ असतील तर तरूण स्त्रीची चिंता जाणावी. याच प्रकारें पुरुषसंबंधीं चिंता असल्यास वयोमान सांगावें.

**अस्ते सितारर्रविभिः परकीय जाया स्वीया गुरौ शशिनि तत्तनये च वेश्या ॥ वाच्या वयश्च शशिवत्परिचिंतनीयं सौरेंत्यजातिरितरैरपि चिंतिता स्यात् ॥२॥**

प्रश्नलग्नापासून सप्तमस्थानीं रवि, भौम, शुक्र असतील तर चिंतित स्त्री परस्त्री आहे. गुरु असल्यास स्वतःची स्त्री. चंद्र बुध असल्यास वेश्या. शनि राहु केतु असल्यास अंत्यजातीची. चंद्राच्या भुक्तांशावरून वय ठरवावें.

**लग्ने ग्रहैरात्मसमो बलस्थैर्भ्राता तृतीयैस्तनयः सुतस्थैः ॥ माता चतुर्थैरथवा स्वसास्याच्छत्रुस्थितैः शत्रुगतैव चिंता ॥ ३ ॥ भार्या भवेत्सप्तमगैरमीभिर्धर्मः श्रितो धर्मसमाश्रितैश्च ॥ स्वस्थैर्गुरुः स्वांशपमित्रशत्रुस्थानेषु तद्वद्बलवत्सुवाच्यम् ॥ ४ ॥**

माझ्या मनांत कोणती चिंता आहे? असा प्रश्न असल्यास बलिष्ठ ग्रह लग्नीं असतील तर आपल्यासदृश मनुष्याची पृच्छक चिंता करितो. तृतीयांत बलिष्ठ ग्रह असतील तर बंधूसंबंधीं चिंता. पंचमांत पुत्राविषयीं. चतुर्थांत आईची किंवा बहिणीची. षष्ठांत शत्रुविषयीं. सप्तमांत भार्येची. नवमांत धर्मसंबंधीं. दशमांत गुरूविषयीं चिंता सांगावी. तसेंच तात्कालिकनवांशीं नवांशस्वामी बलिष्ठ असल्यास स्वतःची चिंता. नवांशपतीचा मित्र बलिष्ठ असेल तर मित्राची चिंता. व नवांशपाचा शत्रू तात्कालिक नवांशीं बलिष्ठ असल्यास पृच्छक आपल्या शत्रूसंबंधीं चिंता करितो असें समजावें.

**भागे चरे चरविलग्नगते च मध्याद्भ्रष्टप्रवासविषया भवतीह चिंता ॥ भ्रष्टः स चेद्भवति सप्तमनस्तदा तु व्यावर्तते यदि न वक्रगतो ग्रहोसौ ॥ ५ ॥**

प्रश्नकालीं लग्न व नवांश चर असेल तर अर्ध्या मार्गावरून मागें फिरूं इच्छिणाऱ्या प्रवासी मनुष्याची चिंता आहे. तो प्रवासी, सप्तमस्थानीं वक्रगती ग्रह असेल तर मागें फिरेल. व सप्तमांत वक्रग्रह नसेल तर मागें फिरणार नाहीं.

**दीर्घास्तुलालिमृगनायककन्यकाःस्युर्मध्या धनुर्मकरकर्कटयुग्मसंज्ञाः ॥ ऱ्हस्वाश्च मेषवृषमीनघटाः प्रदिष्टा वस्तुप्रमाणमपि राशिसमानमेव ॥ ६ ॥**

मनांत किंवा मुठींत धरलेल्या वस्तूच्या प्रश्नाविषयीं प्रश्नलग्नीं सिंह, कन्या, तूल, वृश्चिक या राशी असल्यास वस्तू दीर्घ आहे. मिथुन, कर्क, धन, मकर या राशी असल्यास वस्तु मध्यम आहे. व मेष, वृषभ, कुंभ, मीन या राशी असतील तर वस्तु ऱ्हस्व ह्मणजे लहान लांबीची आहे असें सांगावें. वरील त्या त्या राशींनाही दीर्घ मध्य ऱ्हस्व अशा संज्ञा आहेत.

**रक्तौ सूर्यमहीसुतौ शशिसितौ श्वेतौ सुधादीधितेः सूनुःस्याद्धरिताकृतिः सुरगुरुः पीतः शनिः श्यामलः ॥ सूर्यः स्याच्चतुरस्रकः क्षितिसुतो वृत्तस्तथारंध्रवान् सौम्यो दीर्घतनुस्तथा शशधरो दीर्घाकृतिः सुंदरः ॥ ७ ॥ जीवो वृत्तवपुः सितस्त्वतिकृशः सौरिश्चदीर्घाकृतिर्मध्ये रंध्रसमन्वितश्च कथितं रूपं ग्रहाणामिदं ॥ इत्येवं कृतचिंतितादिविषयप्रश्नेषु वर्णाकृती द्रव्यस्यापि बलान्वितग्रहवशान्निःसंशयं निर्दिशेत् ॥ ८ ॥**

रविभौम रक्तवर्ण, चंद्रशुक्र श्वेतवर्ण, बुध हरितवर्ण, गुरु पीत वर्ण, शनि श्यामवर्ण, रवीचा आकार चौकोनी, मंगळ वाटोळा व मध्यें छिद्र, बुध लांबोडा, चंद्र लांब व सुंदर आकार, गुरु गोल, शुक्र कृश, शनि लांब व मध्यें छिद्र, याप्रमाणें ग्रहांचीं रूपें आहेत. प्रश्नलग्नाधिप किंवा सर्वांत बलिष्ठ ग्रह यांवरून पृच्छकाच्या चिंतित वस्तूचा वर्ण व आकृती सांगावी.

**लग्ने वाभ्युदितं त्रिकोणभवने स्वांशे निजांशस्थितो**

**यःकश्चिद्ग्रह ईक्षते तदिह वा स्याद्धातुचिंता ध्रुवं ॥ अन्यांशे समवस्थितः पुनरसौ जीवस्य चिंताकरो मूलस्यापि परांशके परिगतः पश्यन्परांशं ग्रहः ॥ ९ ॥**

मुष्टीमध्यें किंवा नष्टवस्तु कसली आहे अशाविषयीं प्रश्न. प्रश्नलग्नीं, पंचमांत अथवा नवमांत, ज्या कुठल्या तरी ग्रहाची दृष्टी पूर्ण आहे, तो ग्रह स्वतःच्या नवांशांत असून, लग्नादि पूर्वोक्त स्थानीं स्वतःच्याच नवांशावर पहात असेल तर, किंवा पूर्वोक्तस्थानीं स्वनवांशांत ग्रह असेल तर तो पदार्थ खनिज धातु वर्गांतील आहे. याप्रकारें पहाणारा किंवा असणारा ग्रह अन्य नवांशांत असेल तर पदार्थ जीववर्गांतील, प्राणि कोटींतील आहे. आणि अन्यांशांत असून दृष्टि किंवा स्थिती दुसऱ्या ग्रहाच्याच अंशांत असेल तर पदार्थ मूलवर्ग वृक्षादि कोटींतील आहे असें समजावें.

**विद्यात्ग्रहे तु विषमे किल धातुमूलजीवान् समे तु विपरीतमिदं विचिंत्यं ॥ लग्नांशकक्रमवशाद्गणनीयमेवं संक्षेप एष विवृतिस्त्वतिचिंतनेन ॥ १० ॥**

हाच प्रश्न विस्तारावांचून संक्षेपांत असा कीं, लग्न विषम असलें तर त्याच्या प्रत्येक नवांशावर अनुक्रमें धातु, मूल व जीवचिंता सांगावी. व प्रश्नलग्न सम असेल तर हाच उलट ह्मणजे जीव, मूल व धातु असा क्रम योजावा.

**बलिनौ भास्करभौमौ धातुकरौ संस्थितौ प्रश्ने ॥ मूलकरौ शनिसौम्यौ शशिगुरुभृगुजास्तथा जीवाः ११**

हाच प्रश्न ग्रहांवरून, प्रश्नकालीं रविभौम बलवान् असतील तर धातु; शनिबुध बलिष्ठ असल्यास मूल व चंद्र गुरु शुक्र बलिष्ठ असतील तर जीवकोटी असें सांगावें.

**मेषे सिंहे वृश्चिके वा विलग्ने भौमार्काभ्यामन्विते वीक्षिते वा ॥ धातोश्चिंतां सौरिचंद्रात्मजाभ्यां मूलं युग्मे कुंभकन्यामृगेषु ॥ १२ ॥ मीनकर्कवृषचापतौलिभिश्चंद्रशुक्रगुरुभिर्युतेक्षितैः ॥ जीवमाहुरिति मिश्रितं धनं मिश्रित ग्रहयुतेक्षणात्तथा ॥ १३ ॥**

ह्याच प्रश्न राशि व ग्रहपरत्वें. मेष, सिंह किंवा वृश्चिक यांपैकीं प्रश्नलग्न असून रविभौमयुतदृष्ट असेल तर धातुचिंता. मिथुन, कन्या, मकर, कुंभ यांपैकीं लग्नावर शनिबुध असतील किंवा पाहतील तर मूलचिंता, आणि वृषभ, कर्क, तुला धनु व मीन यांमधील लग्न असून तें चंद्र, गुरु किंवा शुक्र यांनीं युक्तदृष्ट असल्यास जीवचिंता. लग्न व ग्रहस्थिति दृष्टीमिश्रित असेल तर मिश्रित वस्तु आहे.

॥ इति मनोमुष्टिचिंताध्यायो दशमः ॥ १० ॥

---

## ॥ अथ वृष्टिनिर्णयाध्यायः प्रारभ्यते ॥ ११ ॥

**चंद्रार्कयोः शनिसितौ यदि सप्तमस्थौ तुर्येष्टमे च भवतो यदि वा विलग्नात् ॥ स्यातां धने च सहजे यदि तौ विलग्नाद्वर्षासु वर्षमचिरेण तदा विधत्तः ॥१॥**

पर्जन्यकालीं वृष्टिप्रश्न असल्यास, प्रश्नकालीं चंद्रसूर्यांच्या सप्तमांत शुक्रशनी असतील, किंवा लग्नापासून चतुर्थ अष्टमस्थानीं किंवा द्वितीय तृतीयस्थानीं शुक्रशनी असतील तर वृष्टि तात्काल होईल असें जाणावें.

**पक्षे सिते सलिलराशिगताः शुभाश्चेत्केंद्रद्वितीयसहजालयगाश्च सम्यक् ॥ चंद्रोथवा सलिलराशि विलग्नगश्चेत् वृष्टिं वदेन्नियतमेव तदा धरित्र्याम् ॥२॥**

शुक्लपक्षांत शुभग्रह जलराशींत असून प्रश्नलग्नापासून केंद्र, द्वितीय, तृतीयस्थानीं असतील किंवा चंद्र, लग्नीं जलराशींत असेल तर पर्जन्य खात्रीनें लौकर पडेल. वृषभ, कर्क, तुळ, वृश्चिक, मकर, कुंभ, मीन या सात जलराशी होत.

**कर्कटमृगमीनानामुदये चंद्रः सितोपि वृष्टिकरः ॥ तद्वत्केंद्रोपगतौ सितचंद्रौ वा शुभैर्दृष्टौ ॥ ३ ॥**

प्रश्नलग्न कर्क, मकर किंवा मीन असून तिथें चंद्र किंवा शुक्र असेल तर अथवा पूर्वोक्त राशींचे चंद्रशुक्र शुभग्रहदृष्ट असे केंद्रांत असतील तर उत्तम पाऊस पडेल असें सांगावें.

शीतद्युतिः सलिलराशिविलग्नगामी वीर्यान्वितेन भृगुजेन निरीक्षमाणः ॥ वृष्टिं करोति महतीं भृगुजोपि तद्वत् शीतांशुना बलयुतेन विलोकितश्चेत् ॥ ४ ॥

प्रश्नलग्नीं वृषभ, कर्क, तुला, वृश्चिक, मकर, कुंभ, मीन या जलराशी असतील व तेथें शुक्रानें अवलोकित पूर्णचंद्र किंवा चंद्रानें पाहिलेला शुक्र असेल तर मोठी वृष्टि होईल.

॥ इति वृष्टिनिर्णयाध्यायो एकादशः ॥ ११ ॥

---

## ॥ अथ विवाहनिर्णयाध्यायः प्रारभ्यते ॥ १२ ॥

लग्नाच्छशी त्रिमदनायसुतारिसंस्थः सूर्यामरेज्य शशिजैरवलोक्यमानः ॥ प्रष्टुर्भवेन्नियतमेव विवाह दाता केंद्रत्रिकोणभवनेष्वथवा शुभाश्च ॥ १ ॥ अत्रैव यदि योगेस्याच्छुभः सप्तम वेश्मनि ॥ तदा लभेत सज्जायां पापश्चेत् रूप वर्जिताम् ॥ २ ॥

प्रश्नलग्नापासून तृतीय, पंचम, षष्ठ, सप्तम, एकादश या स्थानीं चंद्र असून त्यावर रवि, बुध व गुरूची दृष्टी असेल तर किंवा केंद्रांत व त्रिकोणांत शुभग्रह असतील तर विवाहयोग होईल. या योगांत सप्तम स्थानीं शुभग्रह असेल तर सुंदर स्त्री मिळेल व पापग्रह असल्यास कुरूप स्त्री मिळेल असें सांगावें.

समस्थिते सूर्यसुते वरस्य लभ्या भवेन्निश्चितमेव कन्या ॥ अतोन्यथात्वं विषमस्थितेस्मिन्निःसंशयं प्रष्टुरुदाहरन्ति ॥ ३ ॥

प्रश्नलग्नापासून सम म्हणजे द्वितीय चतुर्थादि स्थानीं शनि असेल तर वराला कन्यालाभ होईल. विषम म्हणजे प्रथम तृतीयादि स्थानीं शनि असल्यास कन्या मिळणार नाहीं.

सप्तमवित्तोपचयस्थानस्थो गुरुनिरीक्षितश्चंद्रः ॥ विदधाति युवतिलाभं तन्नाशं पापयुतदृष्टः ॥ ४ ॥

प्रश्नलग्नापासून द्वितीय, सप्तम व तृतीय, षष्ठ, दशम, लाभ या उप चयस्थानीं गुरुदृष्ट चंद्र असल्यास स्त्रीलाभ शीघ्र होईल. आणि तो चंद्र पापयुत किंवा दृष्ट असल्यास होणार नाहीं.

**यस्य प्रश्नविलग्नात् षष्ठाष्टमराशिगो भवेच्चंद्रः ॥**
**व्यूढस्य तस्य नूनं मृत्युः स्यादष्टमे वर्षे ॥ ५ ॥**

प्रश्नलग्नापासून षष्ठ किंवा अष्टमचंद्र असेल तर विवाह झाल्यानंतर आठ वर्षांनीं त्या वरास मृत्यु येईल असें जाणावें.

**यदि लग्नगतः क्रूरः पापस्तस्माच्च सप्तमे भवति ॥**
**सप्तभिरेव तदाब्दैः पुंसो निधनं विनिर्देश्यम् ॥ ६ ॥**

प्रश्नलग्नीं क्रूर ग्रह असून सप्तमस्थानींही पापग्रह असल्यास त्या नवऱ्यास सात वर्षांनीं मृत्यु येईल असें सांगावें.

**एवं लग्नोपगते चंद्रे तस्माच्च सप्तमे भौमे ॥ परतो विवाहकालाज्जीवेन्मासाष्टकं स पुमान् ॥ ७ ॥**

विवाहप्रश्नलग्नीं चंद्र असून सप्तमस्थानीं भौम असल्यास विवाहकालापासून आठ महिन्यांनीं वरास मरण येईल.

**उदयाष्टमराशिसंस्थिते भृगुपुत्रेप्यथवेंदुनंदने ॥ विधवा क्षितिजे तु सप्तमे म्रियते निश्चितमेव कन्यका ८**

विवाहप्रश्नलग्नीं व अष्टमस्थानीं जर बुध अथवा शुक्र असतील तर ती कन्या विधवा होईल व सप्तमस्थानीं मंगळ असेल तर विवाहापूर्वीच कन्येस मृत्यु येईल.

**दिवामणिः सप्तमगो लग्नात्कन्यां मृतप्रजां कुरुते ॥**
**कुलटामुदयोपगतः कुरुते नैवात्र संदेहः ॥ ९ ॥**

प्रश्नलग्नापासून सप्तमस्थानीं सूर्य असेल तर त्या कन्येची संतती जगणार नाहीं. व लग्नीं रवि असल्यास जारिणी होईल. हे वरील योग एकमार्गी असल्यानें सर्वप्रकारें विचार करावा. कारण एकच शुभयोग अनेक दुर्योगांस दूर करितो.

**स क्रूरौ कुरुतोऽमृतांशुशशिजौ षष्ठे स्त्रियं दुर्भगां कुर्वाते शशिभार्गवौ च कुलटामाये च जायास्थितौ ॥ अत्रैवेंदुजभार्गवौ जनयतो वैधव्यमावश्यकं**

**प्रत्येकं च सपापकैर्यदि ततोवश्यं तु वेश्या भवेत् ।१०।**

प्रश्नलग्नापासून षष्ठस्थानीं क्रूरग्रहयुक्त चंद्र व बुध असतील तर ती स्त्री दुर्भागिनी होईल. सप्तम व एकादश पापयुक्त चंद्र व शुक्र असतील तर ती स्त्री व्यभिचारिणी होईल. षष्ठ, सप्तम, एकादशस्थानीं पापयुत बुध शुक्र असतील तर ती स्त्री विधवा होईल. तीनही योग पापग्रहांशीं असल्यास त्यास्त्रीनें वेश्या होईल.

**लग्नात्स्मरेशात्रिसुतारिगश्चेत्गुर्वर्कसौम्यैः शशभृन्न चान्यैः ॥ दृष्टो दिशेदाशु तदा विवाहं चिरात्स विघ्नं त्वशुभेक्षितश्चेत् ॥ ११ ॥**

प्रश्नलग्नापासून तृतीय, पंचम, षष्ठ, सप्तम, एकादश या स्थानीं चंद्र असून, रवि, बुध, गुरु त्यावर पाहतील तर शीघ्र विवाह होईल. आणि जर त्या चंद्रावर इतर, विशेषतः पापग्रहांची दृष्टी असेल तर विघ्नें येऊन फार लांबणीवर पडेल.

**लग्नगं शशिसुतं शशिनं वा वीक्षते बलयुतो यदि शुक्रः ॥ योषिदाप्तिराचिरेण तदा स्यात्पापदृष्टिसहितं तु नहीति ॥ १२ ॥**

प्रश्नलग्नीं बुध किंवा चंद्र असून त्यावर बलिष्ठ शुक्राची दृष्टि असेल तर शीघ्र स्त्री मिळेल. पापदृष्टी असेल तर मिळणार नाहीं.

**चरालयस्थौ यदि लग्नचंद्रौ विलोक्यमानौ भृगुनंदनेन ॥ पापग्रहाः कंटकसंगताश्चेत्प्रभूतकांतां लभते तदानीम् ॥ १३ ॥**

प्रश्नलग्न व चंद्र चरराशींत असून त्यांवर शुक्राची दृष्टी असेल व पापग्रह केंद्रांत असतील तर पृच्छकाला फार चांगल्या अशा श्रेष्ठ स्त्रीची प्राप्ती होईल.

॥ इति विवाहलाभाध्यायो द्वादशः ॥ १२ ॥

---

## ॥ अथ गर्भस्त्रीपुंजन्मादिविचाराध्यायः प्रारभ्यते ॥ १३ ॥

**स्थिरे विलग्ने स्थिरलग्नगामिभिः शुभग्रहैश्चापि**

विलोकिते च ॥ भूनं युवत्या ध्रुवमेव गर्भं ब्रूयादिति श्रीयवनाधिनाथः ॥ १ ॥

गर्भाविषयींचा प्रश्न असेल तर, स्थिरलग्न असून स्थिरराशींत असलेल्या शुभग्रहांची त्यावर दृष्टि असेल तर खात्रीनें स्त्री गर्भवती आहे असें समजावें. याच्या उलट चरलग्नीं चरराशिस्थित ग्रहांची दृष्टि असल्यास गर्भधारणा झाली नाहीं असें ठरवावें.

लग्नाद्विषमराशिगः शनिः पुत्रजन्मनि भवेत्स कारणं ॥ स्त्रीजनिश्च समगे शनैश्चरे प्राह दिव्यगणको बृहस्पतिः ॥ २ ॥

गर्भ प्रश्नलग्नापासून प्रथम तृतीय इत्यादि विषमस्थानीं शनि असल्यास पुत्रजन्म होईल. व समस्थानीं असल्यास कन्या होईल.

पुरुषवर्गगते च यथोदये नरनभोगतिनाभिनिरीक्षिते ॥ बलिनि निश्चितमेव सुतोद्भवो वरमपीह शुभं लभतेंगना ॥ ३ ॥

प्रश्नलग्न पुरुष ग्रहाचें क्षेत्र असून बाकीचे वर्गही पुरुषग्रहांचे असावे व त्यावर पुरुषग्रहदृष्टि असून तें लग्न स्वस्वामियुतदृष्ट इत्यादि प्रकारें बलिष्ठ असावें ह्मणजे गर्भप्रश्नीं खात्रीनें पुत्रगर्भ व विवाहप्रश्नीं कन्येला उत्तम वर प्राप्त होईल.

उदयगते स्त्री राशौ स्त्री नवभागेपि पुंग्रहाऽदृष्टे ॥ स्त्री जन्म भवति तद्वत्स्त्री द्रेष्काणोदये यवनः ॥ ४ ॥

प्रश्नलग्नाचे षड्वर्ग स्त्रीग्रहांचे असून त्यावर पुरुषग्रह पाहत नसतील व स्त्रीग्रहांचीच दृष्टि असेल तर कन्याजन्म होईल.

ओजर्क्षे पुरुषांशकेषु बलिभिर्लग्नार्कगुर्विंदुभिः पुंजन्म प्रवदेत्समांशकगतैर्युग्मेषु तैर्योषितः ॥ गुर्वर्कौ विषमे नरं शशिसितौ वक्रश्च युग्मे स्त्रियं धीलाभोपगतैः शुभैरुदयतः स्त्रीगर्भयुक्ता ध्रुवं ॥ ५ ॥

प्रश्नलग्न, रवि, चंद्र व गुरु बलिष्ठ असे विषमराशींत व पुरुषग्रहांच्या नवांशांत असतील तर पुत्रजन्म. तेच लग्नादिक समराशींत व

स्त्रीग्रहनवांशांत असल्यास कन्याजन्म. तसेंच रवि आणि गुरु प्रथम तृतीयादि विषमस्थानीं असतील तर पुत्र. व चंद्रशुक्र व राहु द्वितीय चतुर्थादि समस्थानीं असल्यास स्त्रीजन्म होईल. प्रश्नलग्नापासून पंचम आणि एकादशस्थानीं शुभग्रह असतील तर स्त्री गर्भिणी आहे असें सांगावें.

**चंद्रलग्नांतरगतैर्ग्रहैः स्युरुपसूतिकाः ॥ बहिरंतश्च चक्रार्धे दृश्याऽदृश्यान्यथा परे ॥ ६ ॥**

प्रश्नलग्नापासून चंद्रापर्यंत मध्यें जेवढे ग्रह असतील तेवढ्या उपसूतिका ह्मणजे सुइणी आहेत असें सांगावें. त्यांतून द्वितीयापासून सप्तमापर्यंत अदृश्यभागांत जेवढे ग्रह असतील तेवढ्या आंत व अष्टमापासून लग्नापर्यंत दृश्य गोलार्धांत जेवढे ग्रह असतील तेवढ्या बाहेर आहेत असें समजावें.

**बलयुक्तौ स्वगृहांशेष्वर्कसितावुपचयर्क्षगौ पुंसाम् ॥ स्त्रीणां वा कुजचंद्रौ यदा तदा संभवति गर्भः ॥ ७ ॥**

ज्यावेळीं पुरुषाच्या उपचयस्थानीं बलिष्ठ स्वगृहांशांचे रविशुक्र व स्त्रीच्या उपचयांत तसेच चंद्रमंगळ असतील त्यावेळीं गर्भाची धारणा होते. ह्मणजे गर्भसंभवकालीं वरील योग असतो. तृतीय, षष्ठ, दशम, एकादश हीं उपचयस्थानें होत.

**सौरांशेऽब्जांशे वा चंद्रः सौरान्वितोथ वा हिबुके ॥ शांतो दीपो जन्मन्याधाने प्रश्नकाले वा ॥ ८ ॥**

जन्म, आधान किंवा प्रश्न या लग्नापासून चतुर्थस्थानीं शनि चंद्र असतील, किंवा चंद्र, कर्क, मकर, कुंभ या नवांशीं असेल तर त्या त्या प्रसंगीं दिवा शांत झाला ( विझला ) होता.

**पापद्वयमध्यसंस्थितौ लग्नेंदू न च सौम्य वीक्षितौ ॥ युगपत्पृथगेव वा वदेन्नारी गर्भयुता विपद्यते ॥ ९ ॥**

लग्नास व चंद्रास एकत्र किंवा पृथक् पापग्रह कर्तरी असेल व त्या लग्नचंद्रांवर शुभग्रहाची दृष्टी नसेल तर ज्या गर्भिणी स्त्रीविषयीं प्रश्न असेल ती गर्भासह मृत्यु पावेल असें सांगावें.

**भृगुसुतो वसुधातनयोगुरुर्दिनपतिः शशभृद्रविनंदनः ॥ शशिसुतोपि च लग्नपती रविः शशधरोपि**

च मासपतिः क्रमात् ॥ १० ॥

शुक्र १, मंगळ २, गुरु ३, सूर्य ४, चंद्र ५, शनि ६, बुध ७, गर्भाधान लग्नेश ८, सूर्य ९ व चंद्र १० हे पहिल्या महिन्यापासून गर्भाचे अनुक्रमें मासपती आहेत.

एते यदा शत्रुगृहे वसंति युद्धे जिताः शत्रुभिरस्तगा वा ॥ अन्यत्र वा पीडितदेहभाजो गर्भस्य पातं जनयंति खेटाः ॥ ११ ॥

या पूर्वोक्त मासपती ग्रहांपैकीं ज्या महिन्याचा स्वामी शत्रुगृहीं असेल, किंवा ग्रहयुद्धांत पराभव पावेल किंवा अस्तंगत, पीडीत असेल त्या महिन्यांत गर्भपात होईल.

रक्तस्तीक्ष्णतनुर्दिनेश उदितः सौंदर्यवान् शीतगुः क्रूराक्षो धरणीसुतोतिविनयी सोमात्मजोपि स्मृतः ॥ जीवः पंडितमंडलीषु सहितः शुक्रश्च काणः शनिः खंजो लग्नसमन्वितो निजफलं दत्ते बलं चिंत्यताम् १२

जन्मकालीं किंवा प्रश्नकालीं लग्नीं जो ग्रह असेल त्याप्रमाणें चेहरा जाणावा. रवि- रक्तवर्ण, तीक्ष्णतनु. चंद्र- सौंदर्यवान्. मंगळ- क्रूरनेत्रा. बुध- अतिविनयशील. गुरु- पंडित, शहाणा. शुक्र- काणाडोळा. शनि- खुजा. राहु, केतु शनीप्रमाणें. लग्नीं अनेक ग्रह असतील तर बलिष्ठ ग्रहाचा आकार सांगावा.

॥ इति गर्भस्त्रीपुंजन्मादिविचाराध्यायस्त्रयोदशः ॥ १३ ॥

---

## ॥ अथ प्रकीर्णाध्यायः प्रारभ्यते ॥ १४ ॥

च्युतिर्लग्नाज्ज्ञेया हिबुकगृहतो वृद्धिरुदिता प्रवासः स्यान्मध्याद्भवति विनिवृत्तिः स्मरगृहात् ॥ ग्रहैरेतत्प्रश्नोदयसमयगैर्वाच्यमखिलं प्रविष्टः स्वं गेहं हिबुक गृहगे प्रोषितपुमान् ॥ १ ॥

च्युति ह्मणजे असलेल्या स्थितींतून खालीं येणें या विषयींचा प्रश्न लग्नावर पहावा. वृद्धि ह्म. अभ्युदयाचा प्रश्न, चतुर्थ भावावर पहावा. प्रवास होणें व प्रवासांत सुखसंबंधीं प्रश्न दशमस्थानीं पहावा. विनिवृत्ति ह्मणजे प्रवास धंदा इत्यादिकांतून माघारें येणें हा प्रश्न सप्तमभावावर पहावा. तसेंच प्रवासी घरीं पोंचला कीं नाहीं हें चतुर्थस्थानावरून पहावें. ह्मणजे त्या त्या स्थानीं शुभग्रह असतील व पहातील तर शुभ फल. अशुभयोगांचें अशुभफल. शुभाशुभांचें मिश्रफल.

**लग्नात्द्वितीयनिधनास्तमयेषु सौम्यैः पापैस्त्रिषष्ठभ गतैश्च शुभं फलं स्यात् ॥ व्यत्यासतः सपदि सेवक सेव्ययोश्च नित्यं प्रवासकलहौ प्रतिपादनीयौ ॥ २ ॥**

स्वामी व सेवक यांचा स्नेह जुळेल कीं नाहीं, अशा प्रश्नासंबंधीं, लग्नापासून २।७।८ या स्थानीं शुभग्रह व ३।६ या स्थानीं पापग्रह असतील तर, उभयतांस शुभ फल. याच्या उलट असेल तर, त्यांमध्यें नित्य कलह व सदा प्रवासीपणा होईल असें सांगावें.

**सौम्यैरष्टमसंस्थैर्द्वितीयसंस्थैस्तथैव दीर्घायुः ॥ भवति प्रष्टुर्नित्यं तदन्यथात्वेऽन्यथात्वं स्यात् ॥ ३ ॥**

आयुष्याविषयींच्या प्रश्नाविषयीं, प्रश्नलग्नापासून अष्टम व द्वितीयस्थानीं शुभग्रह असतील तर दीर्घायु. पापग्रह असतील तर पृच्छकास अल्पायु योग आहे असें सांगावें.

**दशमचतुर्थैरेभिः सुखसंपत्तिः क्षतिस्तु विपरीते ॥ वित्तैकादशसंस्थैर्वित्ताप्तिः प्रष्टुरादेश्या ॥ ४ ॥**

सुखदुःख लाभ या प्रश्नांविषयीं, प्रश्नलग्नापासून दशम व चतुर्थस्थानीं शुभग्रह असतील तर सुखप्राप्ति. त्याचस्थानीं पापग्रह असतील तर दुःखप्राप्ति. द्वितीय व एकादशस्थानीं शुभग्रह असतील तर धनप्राप्ति होईल असें सांगावें.

**पापैर्विलग्ने परिपृच्छतस्तु शरीरपीडा कलहश्च वाच्यः ॥ सुखक्षतिः स्यात्सुखगैर्गृहस्य भेदस्तथा बांधवविग्रहश्च ॥ ५ ॥**

आरोग्य ऐक्य वगैरेविषयीं, प्रश्नलग्नीं पापग्रह असेल तर शरीर

पीडा व कलह होईल. चतुर्थांत पापग्रह असल्यास सुखनाश, घरांत फूट व बंधुजनविरोध असें फल सांगावें.

**अस्तस्थितैः स्याद्गमनस्य बाधः कर्मस्थितैः कर्मविनाशमाहुः ॥ सर्वत्रचामुत्र शुभेन दृष्टे कृच्छ्रेण संसिद्धिमुदाहरंति ॥ ६ ॥**

प्रवास व उद्योगप्रश्नाविषयीं, लग्नापासून सप्तमस्थानीं पापग्रह असतील तर प्रवास होणार नाहीं. दशमांत पापग्रह असल्यास उद्योगाचा, कर्माचा नाश होईल. आतां, वरील सर्व अशुभ योगांवर जर शुभग्रहांची दृष्टि असेल तर प्रयासानें ती ती कार्यसिद्धी होऊन शुभफल मिळेल.

**शीतद्युतौ पापयुतेक्षिते वा नारीजनैः स्यात्सह विग्रहस्तु ॥ सुखस्थितैर्द्यूनगतैश्च यद्वा तथैव पापैरव धारणीयः ॥ ७ ॥**

स्त्रियांच्या स्नेहाविषयीं-चंद्र जर पापग्रह युक्त किंवा दृष्ट प्रश्नकालीं असेल तर, किंवा प्रश्नलग्नापासून चतुर्थ किंवा सप्तम पापग्रह असतील तर, स्त्रियांबरोबर कलह, वाईटपणा होईल.

**लग्नादष्टमगेऽर्के शुभयुक्ते वा शुभेन संदृष्टे ॥ तस्माद्देशादन्यं देशं गतः पिता तस्य ॥ ८ ॥**

परदेशीं गेलेल्या पित्याविषईं-प्रश्नलग्नापासून अष्टमस्थानीं शुभ ग्रह युक्त किंवा दृष्ट असा रवि असेल तर पिता ज्या ठिकाणीं गेला होता तिथून दुसरीकडे गेला असें सांगावें.

**सूर्यः कटुः शशधरो लवणो महीजस्तिक्तो विमिश्रितरसश्च शशांकसूनुः ॥ जीवो भवेच्च मधुरोम्लकषायकौ च शुक्रार्कजौ च बलवानिह केंद्रगामी ॥९॥ यस्तत्र काले किल लग्नदृग्वा ग्रहो रसस्तस्यतु यः प्रदिष्टः ॥ स एव तावत्प्रतिपादनीयो बलक्रमेण द्वितये रसाश्च ॥१०॥ सौम्यर्क्षसंस्थस्य स शोभनः स्यात्पापर्क्षसंस्थस्य तु नीरसः स्यात् ॥ ग्रहस्य वक्रस्य रसं न भोक्ता भुंक्ते च पात्रे च पुनः प्रदत्तम् ॥ ११ ॥**

सूर्यादिग्रहांचे रस—सूर्य-तिखट. चंद्र-खारट. मंगळ-कडू. बुध-मिश्र. गुरु-मधुर. शुक्र-आंबट. शनि-तुरट. केंद्रांत बलवान जो ग्रह असेल, किंवा लग्नावर ज्या ग्रहाची दृष्टी असेल, त्या ग्रहाचा रस प्राप्त होईल. पुष्कळ ग्रह केंद्रांत, किंवा लग्नास पहात असतील तर बलिष्ठ प्रमाणें अनुक्रमानें त्या त्या रसांची प्राप्ती होईल.ते ग्रह शुभग्रहांचे राशीस असतील तर ते रस स्वादयुक्त असतील व पापग्रहांचे राशीस असतील तर स्वादरहीत असतील. त्यांत एकादा ग्रह वक्री असल्यास त्याचा रस प्रथम वाढलेला खाण्यास न मिळतां दुसऱ्याखेपेस वाढलेला खाण्यास मिळेल.

**स्थिरे विलग्ने न गमागमौ स्तौ न रोगशांतिर्न च वित्तनाशः ॥ मृतो न नष्टो न पराभवोपि चरे विलग्ने विपरीतमेतत् ॥ १२ ॥**

वृषभ, सिंह, वृश्चिक, कुंभ या स्थिरलग्नीं जाण्यायेण्याचा प्रश्न असेल तर, जाणें येणें होणार नाहीं असें सांगावें. तसेंच रोगप्रश्नीं, आरोग्य मिळणार नाहीं. द्रव्यप्रश्नीं, द्रव्यनाश होणार नाहीं. रोगी मनुष्यविषयप्रश्नीं, रोगी मरणार नाहीं. परदेशस्थविषयप्रश्नीं, परदेशीं गेलेला मनुष्य नष्ट होणार नाहीं. युद्धप्रश्नीं, राजाचा पराभव होणार नाहीं असें सांगावें. लग्नचर असेल तर याच्या उलट उत्तर जाणावें.

**विमिश्रितं स्याद्द्वितनौ तदंशद्वये चरस्थावरवद्वदंति ॥ शुभेक्षणाल्लग्नशशांकयोर्वा भवेच्छुभं चाशुभमन्यथा तु ॥ १३ ॥**

प्रश्नकालीं द्विस्वभाव लग्न असल्यास वरील प्रश्नावलीचें मिश्र फल सांगावें. किंवा पूर्वार्धांत स्थिरलग्नवत व उत्तरार्धांत चर लग्नवत फल सांगावीं. प्रश्नकालीं लग्नावर व चंद्रावर शुभग्रह दृष्टि असल्यास शुभफल मिळेल व पापग्रहदृष्टि असेल तर पूर्वश्लोकांत सांगीतलेल्या सर्व प्रश्नांचें अशुभ फल मिळेल.

**रवौ विलग्ने ज्वलनः प्रदीपो रक्तं च वस्त्रं नृपदर्शनं च ॥ श्वेतं च वस्त्रं सितपुष्पगंधा नारी च पीयूषमयूख गर्भे ॥ १४ ॥ महीसुते विद्रुमहेमरक्तस्त्रावस्तथैवार्द्रमृगादिमांसम् ॥ शशांकपुत्रे नभासि**

**प्रयाणं जीवे सुरैर्बंधुजनेन योगः ॥ १५ ॥ शुक्रे सलिलोत्तरणं तुंगाक्रमणं खरांशुपुत्रे च ॥ लग्नस्थे वक्तव्यं स्वप्नप्रश्ने विमिश्रितं मिश्रैः ॥ १६ ॥**

स्वप्नप्रकारज्ञानाविषयीं—प्रश्नलग्नीं रवि असल्यास पृच्छकाला स्वप्नामध्यें अग्नि, दिवा, रक्तवस्त्र व राजा यांचें किंवा यांतील प्रकारांचें दर्शन झालें आहे. प्रश्नलग्नीं चंद्र असल्यास श्वेतवस्त्र, पांढरीं फुलें व गंध, सुंदरस्त्री असे पदार्थ दिसले आहेत. प्रश्नलग्नीं मंगळ असेल तर पोवळीं, सोनें गळणारें रक्त, मृगआदि शुद्ध पशूंचें ताजें मांस असें दिसलें आहे. बुध असल्यास आकाशांत जाणें वगैरे अंतरिक्ष चमत्कार दिसले आहेत. लग्नीं गुरू असल्यास देवता दर्शन, बंधुजनसमागम वगैरे प्रकार. लग्नीं शुक्रयोगानें पाण्यांत उतरणें पोहणें वगैरे प्रकार दिसले आहेत. शनी असेल तर पर्वतावर वगैरे उंचावर चढण्याचा प्रकार पाहिला आहे. या प्रमाणें अनेक ग्रह प्रश्नलग्नीं असतील तर त्या त्या ग्रहांसंबंधीं प्रकार मिश्र तरेचे दिसले असें सांगावें.

**शत्रुगृहनीचगृहगैर्दुःस्वप्नो निर्जितैर्ग्रहैर्वाच्यः ॥**
**रविकिरणलुप्तकायैः स्वप्ने प्रष्टुर्भवेद्भंगः ॥ १७ ॥**

स्वप्नप्रश्नलग्नीं जो ग्रह असेल तो आपल्या शत्रुगृहांत, नीचराशींत किंवा युद्धांत पराजीत ( ग्रहयुतींत वामभागीं असलेला ) असेल तर त्या स्वप्नाचे फल दुष्ट आहे. आणि तो ग्रह अस्तंगत असल्यास पृच्छकास अरिष्टकारक.

**अकचटतपया वर्गा रविकुजसितसौम्यजीवसौरीणां**
**॥ चंद्रस्य च निर्दिष्टा प्रश्ने प्रथमोद्भवं वर्णम् ॥ १८ ॥**
**ज्ञात्वा तस्माल्लग्नं संगृह्य शुभाशुभं वदेत्प्रष्टुः ॥**
**वर्गादिमध्यचरमैर्वर्णैः प्रश्नोद्भवैर्विषमं ॥ १९ ॥**
**राशिं लग्नं प्रवदेत् शेषैर्युग्मं सितज्ञजीवानां ॥**
**कुजरविजयोश्च नैवं रविशशिनोरेकराशित्वात् ॥२०॥**
**तस्मात् प्राग्वत्प्रवदेत्पृच्छासमये शुभाशुभं सर्वम् ॥**
**कालस्याविज्ञानादेतच्चिंत्यं सदा प्रश्ने ॥ २१ ॥**

प्रश्न समईं वेलासाधन बरोबर न होणें, वगैरे कारणपरत्वें, जर लग्न कोणतें, याचा निश्चय झाला नाहीं, किंवा एकाच लग्नावर अनेक

प्रश्न, अगर अनेकांचे प्रश्न येतील, तर आरूढ लग्न योजितात. आरूढ लग्न योजण्याचे अनेक प्रकार तूर्त प्रचलित आहेत, परंतु वरील प्रकार निराळा येणें प्रमाणें. शब्द समूहांत वर्ग सात आहेत ते असे-अवर्ग, कवर्ग, चवर्ग, टवर्ग, तवर्ग, पवर्ग व यवर्ग, यांचे स्वामी अनुक्रमें-रवि, मंगळ, शुक्र, बुध, गुरु, शनि, व चंद्र. पृच्छकाच्या मुखांतून प्रथम जें अक्षर येईल, तें ज्या वर्गांतील असेल, त्या वर्गाच्या स्वामीचें लग्न, त्या वेळीं आरूढ प्रकारानें आहे असें समजावें. आतां रवि व चंद्र खेरीज करून, इतर पांच ग्रहांचीं दोन दोन लग्नें असतात. या करतां क, च, ट, त, प, या पांच वर्गांतून प्रश्नकालीं, विषम अक्षर प्रथम निघालें, तर त्या त्या स्वामिग्रहाचें विषम लग्न. व सम अक्षर प्रथम असतां, त्या स्वामीचें समलग्न समजावें. व या लग्नावरून ग्रंथोक्त सर्व शुभाशुभ प्रश्नफलें सांगावीं.

॥ इति प्रकीर्णाध्यायश्चतुर्दशः ॥ १४ ॥

---

## ॥ अथ लग्नचिंताध्यायः प्रारभ्यते ॥ १५ ॥

**देहः कोशो योधो वाह्यं मंत्रः शत्रुर्मार्गोथायुः ॥**
**चित्तं कर्म प्राप्तिर्मंत्री प्राग्लग्नाद्या भावाश्चिंत्याः ॥ १ ॥**

कुंडलींतील लग्नापासून अनुक्रमें बारा स्थानांवर खालील प्रमाणें बारा गोष्टींचा विचार करावा. देह १ धनकोश २ सैन्य ३ वाहन ४ मंत्र ५ शत्रु ६ मार्गगमन ७ आयुष्य ८ मन ९ कर्म १० लाभ ११ मंत्री १२ तीं तीं स्थानें त्यांचीं कारक आहेत.

**त्रिलाभवर्जं रविसौरिभौमा निघ्नंति नो कर्म च सूर्य-भौमौ ॥ पुष्णंति सौम्या रिपुराशिवर्ज्यं नास्तं भृगु-र्मृत्युमिनर्क्षमिंदुः ॥ २ ॥**

जन्मकुंडलींत व प्रश्नकुंडलींत वरीलप्रकारें कारक भाव ठरवून शुभाशुभ ग्रह जसे असतील तशीं फलें समजावीं. तीं येणें प्रमाणें-रवि, शनि व मंगळ हे पापग्रह तृतीय व एकादश स्थानें पुष्ट करतात. व इतर सर्वस्थानीं असतील तर त्यांचा नाश करतात. त्यांतून रवि व मंगळ हे

दशमस्थानाचा नाश न करतां पुष्ट करतात. चंद्र, बुध, गुरु व शुक्र हे शुभग्रह षष्ठस्थानाचा नाश करतात. व इतर सर्वस्थानें पुष्ट करतात. पण त्यांतून शुक्र सप्तम स्थानाचा व चंद्र अष्टमस्थान आणि सिंहराशि, ज्या स्थानीं असेल त्या स्थानाचा नाश करतात.

लग्नोपगतैः सौम्यैरारोग्यं वित्तसौख्यं च ॥
अर्थस्थैरर्थचयो योधोवृद्धिः स्तृतीयस्थैः ॥ ३ ॥
वाहनसुहृदां वृद्धिश्चतुर्थगैः पंचमैस्तु मंत्रबलं ॥
रिपुनाशं षष्ठस्था भृगुवर्ज्यं सप्तमेऽध्वहिताः ॥ ४ ॥
रक्षत्यायुर्निधने शशिवर्ज्यं नवमभे यशः संपत् ॥
कर्माणि सिद्धिर्लाभो बलसंघातश्च दशमाद्यैः ॥ ५ ॥

वरील श्लोकांत जो संक्षेप सांगीतला, तोच विस्तारानें पुनः सांगतात. लग्नीं शुभग्रह असतील तर आरोग्य, द्रव्य व देहसौख्य. धनस्थानीं शुभग्रह असल्यास धनवृद्धि. तृतीयस्थानीं शुभग्रह असतील तर सैन्यबलवृद्धि. चतुर्थांत शुभ असल्यास वाहनें व मित्रांचीवृद्धि. पंचमांत शुभ असल्यानें मंत्र सल्लामसलत वगैरे उत्तम मिळेल. षष्ठांत शुभग्रहांच्या योगें शत्रुंचा नाश होईल. सप्तमांत शुक्रावांचून शुभग्रह असतील तर, मार्गगमनांत कल्याणप्रद. अष्टमांत चंद्राशिवाय इतर शुभग्रह असल्यास दीर्घायुष्य. नवमशुभग्रह यश व धन देतात. दशमांत शुभ, कर्मसिद्धि करतात. एकादशांत शुभग्रह, लाभप्रद. द्वादशांत शुभग्रह असल्यास, मंत्री, सैन्य, अधिकारी, बल इत्यादिकांची वृद्धि होईल असें समजावें.

भौमार्कार्किशशांकैर्लग्ने वधबंधमरणसंत्रासः ॥
अर्थक्षयो द्वितीयैस्तृतीयसंस्थैर्यशो द्युतिमत् ॥ ६ ॥
वाहनमित्रावियोगो मंत्रस्त्रावो रिपुक्षयश्चेति ॥
हिबुकादिषु सप्तमगैः स्वविषयनाशो भृगुसुते च ॥ ७ ॥
मृत्युर्निधनोपगतैः सेनाव्यसनं महन्नवमसंस्थैः ॥
दशमस्थौ कुजसूर्यौ जयदौ भंगप्रदः सौरिः ॥ ८ ॥
जय एकादशसंस्थैः क्रूरैरंत्योपगैः स्वबल भेदः ॥
उपचयवर्जं सौम्यैर्यत्तत्पापैर्विपर्यस्तम् ॥ ९ ॥

वरील प्रमाणेंच पापग्रह भावांत असल्यानें होणारीं फलें सांगतात. प्रश्नलग्नीं रवि, भौम, शनि व चंद्र असतील तर घात, बंधन, मरण व त्रास होईल. द्वितीयस्थानीं वरील सूर्यादिग्रह असल्यास धनाचा नाश होईल. तृतीयांत असतील तर यश व कांति. चतुर्थांत असल्यास मित्र वियोग व वाहनांचा नाश होईल. पंचमांत असल्यानें सल्लामसलत गुप्त न राहतां सर्वांस समजेल. षष्ठांत वरील सूर्यादिग्रह असतां शत्रूचा नाश होईल. सप्तमांत रविभौम शनिचंद्र आणि शुक्र असतां आपल्या देशाचा विषयाचा कर्तव्याचा वगैरे नाश होईल. अष्टमांत शुक्रावांचून पूर्वोक्त ग्रह असल्यानें मृत्यु येईल. नवमांत असल्यास आपलें सैन्य संकटांत पडेल. दशमांत सूर्य, मंगळ जय देतात व शनि पराभव करतो. एकादशांत पूर्वोक्तग्रह विजय लाभ देतात. व द्वादशस्थानीं क्रूरग्रह असल्यास आपल्या सैन्यांतच फाटाफूट होईल. या वरील प्रमाणांत, चंद्राचें फल, जरी इतर पापग्रहांच्या बरोबरीनें सांगीतलें आहे, तरी लग्न, अष्टम, व द्वादशस्थानीं मात्र वाईट असून, इतर स्थानांतील चंद्रफल, इतर शुभग्रहांच्या फलाप्रमाणेंच असावें असें दिसतें. तात्पर्य, ३।६।१०।११ या उपचय स्थानांशिवाय, अन्यस्थानीं शुभग्रहांचें जें फल सांगीतलें आहे त्याच्या उलट पापग्रहांचें जाणावें.

क्रूरोप्यनुकूलस्थः शस्तो लग्ने शुभोपि नानिष्टः ॥
वक्री न शुभः केंद्रे तदहस्तद्वर्गलग्नं च ॥ १० ॥

लग्नीं शुभग्रहाप्रमाणें, क्रूरग्रह असून, तो जर उच्च, स्वक्षेत्रीं, शुभ युत दृष्ट वगैरे प्रकारें अनुकूल असेल, तर त्यांचें फल चांगलें समजावें. तसेंच केंद्रांत वक्रीग्रह नसावा. वक्री ग्रहाचा वार, लग्न व नवांश आदि वर्ग, हेही अशुभ फल देतात.

नवमांशे तिग्मांशोर्वाहननाशो विलग्नसंप्राप्ते ॥
कृच्छ्रात्स्वगेहगमनं प्रतापमृदुलश्च चंद्रांशे ॥ ११ ॥
कौजेग्निभयं बौधे मित्रप्राप्तिर्धनागमो जैवे ॥
भोगविवृद्धिः शौक्रे भृत्यविनाशो रविसुतांशे ॥ १२ ॥

प्रश्नकालीन लग्नाचा रवि नवांश असतां, वाहननाश होईल. चंद्र नवांशांत लग्न असतां, प्रतापहानि होऊन मोठ्या कष्टानें घरीं येणें होईल मंगळाचे नवांशांत, अग्नीचें भय होईल. बुध नवांशीं मित्रप्राप्ति. गुरु नवांशीं धनलाभ. शुक्र नवांशीं नानातरेचे भोग मिळतील. शनिनवांशीं नोकरांचा नाश होईल.

**क्षुत्तृष्णार्तिर्मार्गनाशोऽक्षिरोगः क्लेशस्याप्तिस्तिग्मगोः प्राग्विलग्ने ॥ शस्तं चांद्रे देवतार्थं स्वदेशे कौजे पित्तव्यालशस्त्राग्निपीडाः ॥ १३ ॥ बौधे तुष्टिर्वांछितार्प्तिर्यशश्च जैवेर्थाप्तिः स्थानलाभोरिनाशः ॥ स्त्रीरत्नाप्तिः कार्यसिद्धिश्च शौक्रे मांदे वन्हिव्याधिनीचापमानाः ॥ १४ ॥**

प्रश्न कालीं रविलग्न ह्मणजे सिंहराशि असेल तर, क्षुधातृषासंबंधीं पीडा, गमनसंबंधीं कार्यनाश, नेत्ररोग व क्लेशप्राप्ति होईल. चंद्रलग्न असेल तर देवकार्यासाठीं स्वदेशांत जाणें प्रशस्त आहे. भौमलग्न ह्मणजे मेष व वृश्चिक राशि असेल तर पित्तरोग, सर्प, शस्त्र, अग्नि यांपासून पीडा होईल. बुधाच्या राशींचें लग्न असल्यास संतोष व इच्छित फल प्राप्ति व यश. गुरु राशींचें लग्न असेल तर धन व स्थान लाभ होऊन शत्रूचा नाश होईल. शुक्राच्या राशींपैकीं लग्न असल्यास स्त्रिया, रत्नें यांची प्राप्ति व कार्य सिद्धि. मकर, कुंभ हीं शनिराशिलग्नें असल्यास, अग्नि, रोग यांचे भय व नीच पुरुषाकडून अपमान होईल. या प्रमाणें, मुख्यतः यात्रा प्रश्नाचें, लग्नावरून फल सांगावें.

**यदुदयति फलं प्रदिष्टं जनयति तस्य नवांशको विलग्ने ॥ शुभ भवन नवांशके सहायं रिपुबलभाग उपैति यातुरर्थात् ॥ १५ ॥**

या वरील दोनी प्रमाणावरून लग्नांचें व नवांशांचें शुभ व अशुभ फल सारखेंच आहे. फरक असेल तिथें विशेष समजावा. शुभलग्नीं शुभनवांश असतां राजा शत्रूवर स्वारी करील तर, शत्रूसैन्याचा एक भाग याचें साहाय्य करील.

**शुभर्क्षे तन्नवांशे च यो याति मनुजेश्वरः ॥ तस्य शत्रूबलान्नेता साहाय्यमुपगच्छति ॥ १६ ॥**

वरील योगच पुनः सांगतात. शुभलग्नीं शुभनवांशीं स्वारिवर निघणाऱ्या राजाचें, शत्रूचा सेनापती फितूर होऊन, सहाय्य करील. हा योग एकांशीं आहे. यास ग्रहबल पाहिजेच.

**उदयमुदयपं वा जन्मभं तत्पतिर्वा तदुपचयगृहं वा**

**प्रश्नलग्ने यियासोः ॥ विनिहतमरिपक्षं विद्धि शत्रो-**
**रिदं वा यदि हिबुक समेतं पृच्छतोऽस्तस्थितं वा ॥ १७ ॥**

पृच्छकाचें जन्मलग्न व त्याचा स्वामी, पृच्छकाची जन्मराशी व तिचा स्वामी, आणि जन्मलग्न व राशीपासून ३।६।१०।११ या उपचयस्थानांतील राशि, या योगांपैकीं एकतरी प्रश्नलग्नीं असेल तर, शत्रूवर स्वारी करणाऱ्या पृच्छकाच्या शत्रूचा नाश होईल हा एक योग. वर सांगीतल्याप्रमाणें शत्रूचें जन्मलग्न, राशि, त्यांचे स्वामी व उपचयराशी, प्रश्नलग्नापासुन चतुर्थस्थानीं असतील तर, किंवा पृच्छकाचीं जन्मलग्नादिक व पृच्छकाच्या शत्रूचीं जन्मलग्नादिक, प्रश्नकालीं सप्तमस्थानीं असतील तर, वरील चार योग असतां पृच्छकराजाच्या शत्रूचा नाश होईल असें सांगावें.

**वृषवृश्चिककर्कटैर्नृणामनुकूलैरपि लग्नमाश्रितैः ॥ गम**
**नं च वदंत्यशोभनं मुनयोंत्यर्क्षसमाश्रितैरपि ॥१८॥**
**मीने कुटिलो मार्गो भवति तदंशेन्यराशिलग्नेपि ॥**
**नो यानमाप्यलग्ने कार्यं तेषां नवांशेपि ॥ १९ ॥**

वरील प्रकारांतील विशेष सांगतात. वरील सर्व योगांत, वृषभ, कर्क व वृश्चिक या राशी, प्रश्नकालीं, लग्नीं व द्वादशस्थानीं शुभ नव्हेत, असें प्राचीन ऋषी सांगतात. प्रश्नकालीं मीनलग्न, किंवा कुठल्याही लग्नाचा मीन नवांश असेल तर जाणाऱ्याचा मार्ग क्लेशदायक होईल. तसेंच प्रश्नकालीं कर्क, मकर, कुंभ, मीन या जलराशींपैकीं लग्न किंवा नवांश येईल तर गमन करूं नये.

**व्यतिपातविष्टिवैधृतिपापग्रहलग्नदिवसेषु ॥**
**चौर्यावस्कंदानृत संग्रामाः सिद्धिमायांति ॥ २० ॥**

व्यतीपात, भद्रा, वैधृती, पापग्रहांचीं लग्नें व वार यांवर चोरी, धाडा, खोटें बोलणें, युद्ध वगैरे दारूण कार्यें सिद्ध होतात

**लग्नस्ययोंशको देवि तस्यस्वामी तु यो ग्रहः ॥**
**तद्वशात्कार्यविज्ञानमुदितांशक संख्यया ॥ २१ ॥**
**सूर्येयनंक्षणश्चंद्रे दिनान्यारे तथा बुधे ॥ ऋतवश्च**
**गुरौमासा शुक्रे पक्षाः प्रकीर्तिताः ॥ २२ ॥ सूर्यपुत्रे**

सर्वत्रैषाविधिः स्मृतः ॥

...ाही कार्याविषयीं मुदत ठरविणें ती येणें प्रमाणें. प्रश्नलग्नाच्या ... स्वामी जो ग्रह असेल, त्यावरून पुढील प्रमाणें फलाचा अव-धि अयनादीक जाणावा. व जितके नवांश, लग्नाचे भोगले असतील, तितकी संख्या समजावी. नवांशस्वामी सूर्य असल्यास अयन. चंद्र असेल तर क्षण. मंगळ असल्यास दिवस. बुध ऋतु. गुरु असेल तर महिना, शुक्र असल्यास पक्ष व शनि असल्यास वर्ष. जसें, मेष लग्नाच्या सिंह नवांशीं प्रश्न असेल तर, नवांशस्वामी सूर्य असल्यानें, अवधी अयन समजावी. व तो नवांश पांचवा आहे. वरून संख्या पांच अयनें, ह्मणजे अडीच वर्षें, प्रश्नफलाचा अवधी सांगावा. या विषयीं तारतम्य ठेवावें.

दृष्टादृष्ट फलाप्त्यै शास्त्रं हृदये निधाय मिहिरस्य ॥
दैवज्ञवल्लभाख्यं दृष्ट्वा प्रश्नं वदेत्तज्ज्ञः ॥ २३ ॥

श्री वराहमिहिराचार्य यांनीं रचिलेलें हें दैवज्ञवल्लभाख्य प्रश्नशास्त्र नीट हृदयामध्यें ठेवून ज्योतिष्यानें विचारपूर्वक व परिश्रम पूर्वक विश्वासार्ह असें प्रश्नफल सांगावें.

यदुपचितमन्यजन्मनि शुभाशुभं तस्यकर्मणः पक्ति-
म् ॥ व्यंजयति शास्त्रमेतत्तमसि द्रव्याणि दीप इव २४

जसें अंधारांत असलेले पदार्थ, दीप प्रकाशीत करतो तद्वत्, पूर्व-जन्मार्जित शुभाशुभ कर्माचें फल, या जन्मामध्यें जन्मकालीन व प्रश्न कालीन ग्रहयोग दाखवून, ज्योतिःशास्त्र प्रकाशित करतें.

आदित्यदासतनयस्तदवाप्त बोधः कापित्थलः सवि-
तृलब्धवरप्रसादः ॥ आवंतिको मुनिमतान्यवलो-
कययत्नादेतां वराहमिहिरो रचयां चकार ॥ २५ ॥

श्री अवंति नगरांत राहणारा, कापित्थल गोत्री, आदित्यदासपंडिताचा पुत्र व पित्याकडेच ज्यानें अध्ययन केलें असून, श्रीभगवान् सू-

यांची आराधना करून, ज्यानें शास्त्र सिद्धिरूपी वर घेतला आहे, असा महाभाग, श्रीवराहमिहिराचार्य पंडि-त्या ग्रंथांचा प्रयत्नपूर्वक अभ्यास करून हा दैवज्ञवल्लभा नांवाचा शास्त्रग्रंथ रचता झाला. तो सर्वांस कल्याणप्रद होवो.

॥ इति लग्नचिंताध्यायःपंचदशः ॥ १५ ॥

— इति दैवज्ञवल्लभा —

महाराष्ट्र भाषांतर

सहिता

स मा प्तः

मराठी ग्रं. संग्रहालय ठाणे
वा. क्र. ३e४०